स्वादमय सेवेचा • राजस्थानी थाळी •
स्वादिष्ट.. रुचकर
भोजनाचा आस्वाद घ्या..
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर फोन: 2327060, 9850799850

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
आता चष्मा घालवा कायमचा
चष्मा नको?
कॉन्टॅक्ट लेन्स • मोतिबिंदू • काचबिंदू • नेत्रदोषांवर
मोफत नेत्रतपासणी रक्तातील्या वरत शस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १ नोंदणीची आवश्यक
साई सूर्य नेत्रसेवा
सूर्यवंशी सर्जरी करा
कर्वेनगर, मालिक चौक, जा नगर ५१५००१
Email : saisuryaa85@yahoo.com
www.saisuryasupervision.com
Help line 9112288611 Appointment 8888982222

रजि नं. १४४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. २६.०७.२०२४ | अंक नं. १२५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्पर्टीव्हट आकर्षक गिफ्ट
30 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

मयत व्यक्तीच्या जागी 'तोतया' व्यक्ती उभी करून प्लॉटची विक्री

६ जणांच्याविरुद्ध नगरमध्ये गुन्हा दाखल; ५ आरोपींना पोलिसांकडून अटक

नगर – बनावट कागदपत्रे तयार करून मयत व्यक्तीच्या जागी तोतया व्यक्ती उभी करून २ प्लॉटची परस्पर खरेदी करत नोकरदार व्यक्तीची व त्याच्या कुटुंबियांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. प्रशांत अर्जुन शेकटकर (वय ५२, रा.बोरुडे मळा) असे फसवणूक झालेल्या नोकरदाराचे नाव आहे. त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून सहा जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुवेंद्र संतोष डाबी (रा. सौरभ कॉलनी, सुरज कॉम्प्लेक्स, राघवेंद्रस्वामी मंदीर जवळ, बोल्हेगाव), फिर्यादीच्या मयत वडीलांच्या जागी उभा केलेला तोतया इसम, तसेच लिहून देणारा व लिहून घेणारा यांना व्यक्ती ओळख देणारे साक्षीदार शरद विनायक कांबळे (रा. सातभाई गल्ही, चितळे रोड), सचिन शरद कांबळे (रा. सातभाई गल्ही, चितळे रोड), अजय वसंत दराडे (रा.बागडपट्टी, अहमदनगर), विनायक मच्छिंद्र सोझीस (रा.बागडपट्टी, अहमदनगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तींची नावे आहेत. यातील विनायक सोझीस बगळता इतर ५ जणांना कोतवाली पोलिसांनी गुरुवारी (दि.२५) रात्री अटक केली आहे.

फिर्यादी शेकटकर यांच्या वडिलांच्या नावे वडगाव गुप्ता शिवारात स.नं. ७ मध्ये प्लॉट नं. १ चे क्षेत्र १५४.०५ चौ.मी. व प्लॉट नं. १ चे क्षेत्र १११.०५ चौ.मी. हे दोन्ही प्लॉट होते. वरील ६ आरोपींनी संगनमत करून फिर्यादी यांच्या मयत वडिलांच्या जागी तोतया इसम उभा करून व त्याचे बनावट कागदपत्र तयार करून सह. दुय्यम निबंधक वर्ग – २ कार्यालयात बनावट खरेदी दस्त नंबर ७४८०/२०२२ तयार करून या दोन्ही प्लॉटची परस्पर विक्री करत फिर्यादी व त्यांच्या कुटुंबियांची फसवणूक केली.

हा प्रकार ३० नोव्हेंबर २०२३ रोजी घडला होता. तो आता फिर्यादीच्या निदर्शनास आल्याने त्यांनी सर्व चौकशी करून गुरुवारी (दि.२५) दुपारी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी ६ जणांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झाल्यावर पो.नि. प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी स.पो.नि. योगिता कोकाटे व पोलिस पथकाने रात्री ५ जणांना अटक केली आहे.

आरोपी डाबीवर यापूर्वीही दाखल आहे असाच गुन्हा

या गुन्ह्यातील आरोपी सुवेंद्र संतोष डाबी याच्यावर यापूर्वी मार्च २०२३ मध्ये कोतवाली पोलिस ठाण्यात्तच अशाच प्रकारचा गुन्हा दाखल झालेला आहे. आरोपी सुवेंद्र डाबी याने इतर ५ साथीदारांच्या मदतीने शमेबर बालुराम कलवार (वय ६२, मु. रा. सेतन्य नगर, प्रोफेसर कॉलनी, सावेडी, हल्ली रा. विमाननगर, पुणे) यांच्या मयत वडिलांच्या नावे नालेगाव येथे असलेला प्लॉट मयताच्या जागी तोतया इसम उभा करून परस्पर खरेदी करत फिर्यादी कलवार यांची ४४ लाख ३५ हजार ५०० रुपयांची फसवणूक केली होती. याबाबत रामेश्वर कलवार यांच्या फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा अशाच प्रकारचा गुन्हा दाखल झाला आहे.

'आम्ही नगरचे बाप आहोत' म्हणत दोघांना बेदम मारहाण

चाँदबीबी महालावरील घटना; एका आरोपीला पोलिसांनी पकडले

नगर – चाँदबीबी महालाच्या डोंगरावर व्यायाम करण्यासाठी गेलेल्या चुलता – पुतण्याला ५ जणांच्या टोळक्याने आम्हाला ओळखले नाही का? आम्ही नगरचे बाप आहोत, असे म्हणत चाकू, लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करत त्यांच्या चारचाकी वाहनाचे नुकसान केल्याची घटना बुधवारी (दि.२४) सायंकाळी ७ च्या सुमारास घडली. यातील एका आरोपीला नगर तालुका पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत संग्राम पोपट पोटे (वय ३०, रा. बारदरी, ता.नगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी पोटे व त्यांचा चुलत पुतण्या यश पोटे हे दोघे बुधवारी (दि.२४) सायंकाळी ७ च्या सुमारास चाँदबीबी महाल परिसरात व्यायाम करण्यासाठी गेले होते. त्यांच्या समोरून एक चारचाकी वाहनातून ५ जण आले. त्यांनी गाडी थांबवून शिवीगाळ सुरु केली. तू साईडला हो, तू आम्हाला ओळखले नाही का? आम्ही नगरचे बाप आहोत, असे म्हणाले.

तेव्हा फिर्यादी पोटे यांनी त्यांना काय झाले असे विचारले असता गाडीतून सागर सुभाष ठोंबरे (वय ३२, रा. ब्राम्हणगल्ली, माळीवाडा), अक्षय संजय हम्पे (रा. भिंगार) व अन्य ३ अनोळखी इसम खाली उतरले व त्यांनी मोठयाने शिवीगाळ करत पोटे चुलता – पुतण्यास लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटने नंतर पोटे हे त्यांच्या चारचाकी वाहनातून पोलिस ठाण्यात तक्रार करायला निघाले असता डोंगराच्या पायथ्याशी या टोळक्याने पुन्हा त्यांची गाडी अडवून दोघांना लाकडी दांडके, चाकू व दगडाने मारहाण केली व त्यांच्या चारचाकी वाहनाचे नुकसान केले.

तसेच फिर्यादी नगर तालुका पोलिस ठाण्यात गेल्यावर पोलिस ठाण्याबाहेर थांबून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी ५ जणांच्या टोळक्याविरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ११७ (२), ११८ (१), ११५,३५२, ३५१ (२)(३), १९० , १९१ (१)(३), १२५, ३२४, आर्म ॲक्ट ४/२५ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

गुन्हा दाखल होताच पोलिसांनी सागर सुभाष ठोंबरे (वय ३२, रा. ब्राम्हणगल्ली, माळीवाडा) या आरोपीला अटक केली आहे.

।। श्री गणेशाय नमः ।।
स.न.वि.वि. आमचे येथे श्रीहरी कृपेने
चि. धिरज
(सौ. आशा व श्री. सिताराम हरीभाऊ कुमटकर
रा. पिंपळगाव लांडगा, ता.जि. अ.नगर यांचे द्वितीय चिरंजीव)
चि.सौ.कां. कल्याणी
(सौ. मंदाकिनी व श्री. नंदराम किसन बोठे रा. वाळकी,
ता.जि. अ.नगर यांची द्वितीय कन्या)
।। शुभविवाह ।।
रविवार दि. २८/०७/२०२४ रोजी दु. १२.४५ वा.
या शुभमुहूर्तावर करण्याचे योजिले आहे.
* विवाहस्थळ *
राजयोग लॉन्स,
वाळकी, ता. नगर, जि. अ.नगर
* साखरपुडा व हळदी *
शनिवार दि. २७/०७/२०२४ रोजी
सकाळी ११ व सायं. ६ वा.
* निमंत्रक *
समस्त कुमटकर पा. परिवार
BLACKROCK
माळी विट कारखाना
The Academy
छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक समिती

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

बाई पाहिजे
१२/२४ तास
लहान बाळ सांभाळण्यासाठी
मुलगी/बाई पाहिजे
(वयोमर्यादा १८ ते ४०)
– संपर्क –
8888576576

।। कुलस्वामिनी प्रसन्न ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर–पुणे–नगर
आता आपल्या शहरातून
दरमोज
नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
पुणे येथून स.१०,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट -पिसाळ मॉल, झोडगे कॅन्टीन, शास्त्री ट्रिडींग, राज प्लेस मॉल,कान्टीन मॉल,हेक्सन
पुणे ऑफिस - वाडेकरी, पारगी बागवान,हेमराज, नवीन शिवाजीनगर बसस्टॉप, कुकिन आयकॉनक
अगर-प्रेम हॉलिडेज्
ऑफिस- चितळेरोड,अ.नगर
9657746555/ 9226399555

सर्व पद्मशाली बांधवांना
बागुल पंडुगु
सणानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
– शुभेच्छुक –
आमदार संग्राम अरुणकाका जगताप मित्र परिवार

आकर्षक गिफ्ट आर्टिकल्सवर तसेच नामांकित कंपनीचे ए-४ बुकवर
२५% सूट
आर.एन.आर्ट ॲण्ड क्राफ्ट
गिफ्ट ॲण्ड स्कूल स्टेशनरी । होलसेल ॲण्ड रिटेलर
एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझ्ड गिफ्ट ॲण्ड टॉईज
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर-४१४००१
मो : 9325329061/ 9373417113

जिल्हातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य बुंदेला

email - navamaratha@gmail.com

मराठमोळं गाणं... शंभर नंबरी सोनं...

आपला महाराष्ट्र – महाराष्ट्रीयन व मराठी भाषा सातासमुद्रापार गेलीय. सामान्यतः मराठी भाषेच्या बोलणे, वापरण्याविषयी उदासीनता, खंत वेळोवेळी व्यक्त होत असते.

१९८७ मध्ये न्यू जर्सीमध्ये झालेल्या 'बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात प्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी भाषणाच्या सुरवातीला म्हटले होते.'

''मराठी भाषिक मित्रांनो, भाषणपूर्वी मला एक महत्त्वाचं काम करायचं आहे ते असं की प्रारंभी त्या मुलांनी मराठीतून नमन म्हटलं त्या सर्व मुला-मुलींची त्यांच्या आई वडिलांनी दृष्ट काढावी हे मी त्यांना सांगत आहे.

ह्यांजीमध्ये म्हण आहे, 'सॉंग हॅज ए लॉंगेस्ट लाईफ'. गाणं चिरंतन असतं. या मराठी मुलांच्या ओठांवर, मनात तुम्ही मराठी गाणं दिलं! अशी पाचपन्नास गाणी तुम्ही मुलांच्या ओठावर दिलीत तर मराठी संस्कृतीची चिंता करायचं काहीही कारण उरणार नाही. हे गाणं त्या चिमुकलांच्या बरोबर त्यांच्या वयाच्या नव्वदीपर्यंत जाईल. राहील. जोपर्यंत मराठी गाणं (भाव असलेले विशेषतः) तुमच्या ओठांवर आहे तोपर्यंत तुम्ही असेपिंजत रहा नाही तर आमच्ची कुठंही तुम्ही मराठीचे आहात यात शंका बाळगण्याचे कारण नाही.''

आजही मराठी माणं उत्तरीपण जुनी आशयगर्भ गाणी चित्रपट, चॅनल्स, प्रसारमाध्यमांतून एफएम वरुन श्रोत्यांना पुन्हा पुन्हा ऐकवल्यास, दाखवल्यास मराठी अधिक समृद्ध होणं सहज साध्य होईल.

वाचनीय मननीय मेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"-९८२२०२०६९१

महापालिका कामगारांना दिवाळी सणासाठी ११ हजार रुपयांचे 'सानुग्रह अनुदान' मंजूर

कामगार युनियन व मनपा प्रशासनाची संयुक्त बैठकीत झालेले निर्णय

नगर – अहमदनगर महानगरपालिका कामगार यूनियनची महापालिका प्रशासनाला दिवाळी सणासाठी सर्व कामगारांना सानुग्रह अनुदान मिळणे कामी संप नोटीस दिलेली होती. त्यास अनुसरुन सहा. कामगार आयुक्त यांनी २५/६/२०२४ रोजीच महापालिका प्रशासनास पत्र देवून कामगार यूनियन पदाधिकारी यांच्याबरोबर बैठक घेवून सदर प्रश्न निकाली काढण्याबाबत सूचित केले होते. त्यानुसार महापालिका प्रशासनाची २५ जुलै रोजी कामगार यूनियन पदाधिकारी यांच्याबरोबर संयुक्त बैठक झाली.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे, कामगार यूनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल, सचिवटपीसी कॉ. आनंदराव वायकर, उपाध्यक्ष नंदकुमार नेमाने, कार्याध्यक्ष राहुल साबळे, महादेव कोतकर, बलराज गायकवाड, बाबासाहेब राशिनकर, उपाध्यक्ष अजय सौदे, अमोल लहारे इत्यादी उपस्थित होते. यावेळी मनपा प्रशासनाने कामगारांच्या विविध मागण्या मान्य केल्याबद्दल युनियनच्या वतीने आनंदराव वायकर यांनी आभार मानले.

१. सर्व पात्र कामगारांना दिवाळी सणापूर्वी ११,००० रुपये एक रकमी सानुग्रह अनुदान अदा केले जाईल.

२. कालबध्द पदोन्नतीचा फरक ९३ लाख रुपये ३१ जुलै २०२४ चे आत अदा केले जातील.

३. वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रकरण मंजूर झाल्यानंतर कुठलीही जेष्ठता न लावता तात्काळ संबंधित कर्मचारी यांना वैद्यकीय प्रतिपूर्तीचे पैसे अदा केले जातील.

४. सफाई कामगारांना कचरा वाहन्यासाठी ढकल गाडी लवकरच उपलब्ध करुन देण्यात येईल.

५. लवकरच निवड समिती घेण्यात येवून पात्र कर्मचारी यांना पदोन्नती तसेच कालबध्द पदोन्नतीचे लाभ देण्यात येतील.

६. एल.एस. जी.डी./ एल.जी.एस उत्तीर्ण झालेल्या कर्मचारी यांना जादा वेतनवाढी देणे संदर्भात शासनाकडे पत्र पाठवून मार्गदर्शन घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

७. लाड व पाणे समिती शिफारशीनुसार तसेच अनुकंपा तत्वानुसार ३०५, ५०६ व ७६ वारस सह पात्र कामगारांच्या वारसाना नोकरी लवकरच देण्यात येईल तसेच ज्यांचे कागदपत्रे अपूर्ण आहेत त्यांच्याकडून कागदपत्रे यांची पूर्तता करून घेवून त्यांना देखील लवकरच महापालिका सेवेत नोकरी देण्यात येईल.

तसेच मागील निवड समितीमध्ये मंजूर झालेल्या १२/२४ कालबध्द पदोन्नतीचे प्रकरणावर आयुक्त यांनी स्वाक्षरी केलेली असून लवकरच कालबद्ध पदोन्नती मिळालेल्या सुमारे ३०० कर्मचारी यांना याचा लाभ मिळणार आहे.

नदीकाठावरील गावातील नागरिकांना जिल्हा प्रशासनातर्फे सतर्कतेचा इशारा

नगर – अतिवृष्टीमुळे पुणे जिल्हातील खडकवासला व इतर धरणातुन विसर्ग सुरु आहे. त्यामुळे मिमा नदीस दौंड पुल येथे मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु असुन दौंड पुल येथे मिमा नदीच्या विसर्गामध्ये वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर मिमा नदी काठावरील श्रीगोंदा व व कर्जत तालुक्यातील मिमा नदीकाठावरील गावातील नागरिकांना अति सतर्कतेचा ईशारा देण्यात आला आहे. तसेच नाशिक जिल्हातील नांदुर मधमेश्वर धरणातुन गोदावरी नदी पात्रामध्ये विसर्ग सुरु असुन नाशिक व अहमदनगर जिल्ह्यात सुरु असलेल्या पावसामुळे गोदावरी नदीतील विसर्गामध्ये वाढ होऊ शकते. त्यामुळे कोपरगाव, राहाता, श्रीरामपुर व नेवासा तालुक्यातील गोदावरी नदीकाठावरील गावातील नागरिकांना जिल्हा प्रशासनामार्फत सतर्कतेचा ईशारा देण्यात आला आहे.

नदीकाठावरील गावांनी स्थानिक प्रशासनाद्वारे देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करावे. सखल भागात राहणाऱ्या नागरिकांनी तातडीने सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे. नदी,ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी दक्ष रहावे. पाणी पातळीत वाढ होत असल्यास नागरिकांनी नदीपात्रापासुन तसेच ओढे व नाले यापासुन दुर रहावे व सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. नदी अथवा ओढे नाल्यावरील पुलावरुन पाणी वाहत असल्यास पुल ओलांडु नये. पूर पाहण्यासाठी गर्दी करु नये. जुनाट, मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतीमध्ये आश्रय घेऊ नये. अतिवृष्टीमुळे भूस्खलन होण्याची व दरडी कोसळण्याची शक्यता असते. त्यादृष्टीने डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांनी दक्षता घ्यावी व वेळीच सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. घाट रस्त्याने प्रवास करणे शक्यतो टाळावे. धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. नदीच्या पाण्याच्या प्रवाहाच्या उतरू नये, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. मेघगर्जना होत असताना झाडांच्या खाली न थांबता सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. आपत्कालिन परिस्थितीमध्ये नजीकच्या तहसिल कार्यालय, पोलीस स्टेशन यांच्याशी संपर्क साधावा.

तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथील दूरध्वनी क्रमांक १०७७ (टोल फ्री) अथवा २३५६९४० येथे संपर्क साधावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर राजेंद्रकुमार पाटील यांनी केले आहे.

सावेडीचे तलाठी व मंडल अधिकारी 'लाचलुचपत'च्या जाळ्यात

फेरफार नोंदीसाठी ४० हजारांची लाच मागितल्या प्रकरणी गुन्हा दाखल

नगर – एका प्लॉटची २२ प्लॉट मध्ये विभागणी करून त्या २२ प्लॉटच्या फेरफार नोंदी ऑनलाइन अपलोड करण्याच्या मोबदल्यात अगोदर ४४ हजारांची व नंतर तडजोडी अंती ४० हजारांची लाच मागितल्या प्रकरणी सावेडी चे तलाठी सागर एकनाथ भापकर व महिला मंडल अधिकारी शैलजा राजाभाऊ देवकाते यांच्यावर तोफखाना पोलिस ठाण्यात शुक्रवारी (दि.२६) दुपारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

यातील तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांच्या संयुक्त नावे सावेडी येथे ५८ हजार चौरस फूटचा प्लॉट आहे. सदर प्लॉटचे नगर महापालिका यांचेकडील शासकीय रेखांकन करून सदर प्लॉटचे बांधकाम करण्याकरीता २२ स्वतंत्र प्लॉट मध्ये विभागणी केलेले आहे. या २२ प्लॉटच्या फेरफार नोंदी ऑनलाइन अपलोड केल्याच्या मोबदल्यात सावेडीचा तलाठी सागर भापकर याने पंचा समक्ष तक्रारदार यांच्याकडे ४४ हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती ४० हजार रुपये रक्कम लाच म्हणून स्वीकारण्याची तयारी दर्शवली तसेच महिला मंडल अधिकारी शैलजा देवकाते यांनी तक्रारदार यांच्याकडून सदर प्लॉटच्या फेरफार नोंदी मंजूर करण्यासाठी ४४ हजार रुपये लाच रक्कम स्वीकारल्याचे मान्य करून तलाठी भापकर यांच्यासाठी प्रत्येकी पाचशे रुपये प्रमाणे २२ प्लॉटचे ११ हजार रुपये लाचेची मागणी केली. लाच मागणीची ही घटना दि.१९ मार्च २०२४ रोजी दुपारी ४.५७ ते ४.४४ या कालावधीत घडली होती. त्या पूर्वीच तक्रारदाराने नगरच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केलेली होती. त्यामुळे पोलीस उप अधीक्षक प्रविण लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन पोलीस निरीक्षक शरद गोडें, पो.कॉ. सचिन सुदुढक, पो.कॉ. बाबासाहेब कराड, चालक पो.हे.कॉ.हारुन शेख यांच्या पथकाने या तक्रारीची पडताळणी पंचांच्या समक्ष केली होती. त्यानंतर शुक्रवारी (दि.२६) दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक श्रीमती छाया देवरे या करीत आहेत.

वाढदिवसानिमित्त २७ जुलै रोजी शिवसैनिकांच्या रक्तातून साकारणार 'उद्धव ठाकरे' यांची प्रतिमा

नगर – शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त नगरमधील शिवसैनिकांच्या रक्तातून साकारणार 'उद्धव ठाकरे यांची प्रतिमा', अशी माहिती शहरप्रमुख संभाजी कदम यांनी दिली.

२७ जुलै रोजी वाढदिवसानिमित्त नगर शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वा. शहराचे प्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे आरती, स.११ वा. नेता सुभाष चौक, शिवालय येथे शिवसैनिकांच्या रक्तातून प्रतिमा रेखाटण्यात येणार आहे. तसेच वृक्षारोपण, चारा वाटप करण्यात येणार आहे.

२८ जुलै रोजी सुरभी हॉस्पिटल येथे सर्वरोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या सर्व कार्यक्रमास सर्व पदाधिकारी, माजी महापौर, माजी नगरसेवक, महिला आघाडी, युवा सेना, शिक्षक सेना, माथाडी कामगार सेना आदिंच्या सर्व पदाधिकार्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रेल्वे गाडीच्या धडकेत एकाचा मृत्यू

नगर – रेल्वे गाडीची धडक बसून एकाचा मृत्यू झाल्याची घटना निंबळक शिवारात गुरुवारी (दि.२५) सायंकाळी घडली. गौतम रामदास भोसले (वय ४०, रा. खारे कर्जुने, ता.नगर) असे मयताचे नाव आहे. गौतम भोसले हे निंबळक शिवारात असलेल्या रेल्वे गेट जवळ रेल्वे मार्गा शेजारी गुरुवारी सायंकाळी जखमी अवस्थेत आढळून आले. त्यांना त्यांचा नातेवाईक सोन्या सुनिल पाचारणे (रा. वडगाव गुप्ता) याने सायंकाळी ७.३० च्या सुमारास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.बट्टले यांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतची माहिती वडगावगुप्ता ग्रामपंचायत असलेले तोफखाना पोलिस ठाण्यातील स.फौ. जठार यांनी एमआयडीसी पोलिसांना कळविली. त्यावरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

सौ. रंजना मुळे यांचे निधन

नगर – देशमुखगल्ही येथील रहिवासी सौ. रंजना प्रदीप मुळे (वय ६४, रा.पुणे) यांचे नुकतेच निधन झाले. कापड बाजारातील मुळे इलेक्ट्रीकल्स्चे प्रदीप मुळे यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या मागे पती, एक मुलगा व मुलगी असा परिवार आहे. त्यांच्यावर पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

दिव्यांग मतदार व आधार कार्ड नोंदणी अभियान जिल्हाभर राबवावे

दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – दिव्यांग मतदार व आधार कार्ड नोंदणी अभियान जिल्हाभर राबविण्यात यावे, दिव्यांगांसाठी विशेष शिबीराचे आयोजन करावे, या मागणीचे निवेदन दिव्यांग विकास आघाडीच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना देण्यात आले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे, उपाध्यक्ष महेश विभुते आदि उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, जिह्यातील अनेक दिव्यांग बंधू व भगिनी जाचक अटी असल्यामुळे शासकीय सवलतीपासून आजही वंचित आहेत. परंतु कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर आधार नोंदणी महत्वाची आहे. परंतु जिल्ह्यात बरेच दिव्यांगांची आधार नोंदणी झालेली नाही. त्यांना आधार कार्ड काढतांना जरुर हाताचे ठसे न उमठणे, डोळ्यांच्या बाहुल्या व्यवस्थित नसणे, फेस रिडींग न होणे, अशा अडचणी येतात.

आधार कार्ड काढण्यासाठी दिव्यांग व्यक्ती सेतू कार्यालयापर्यंत गेल्यावर प्राधान्याने त्यांच्याकडे लक्ष न देता त्याला अपमानास्पद वागणूक देणे या सर्व प्रोसेसला कंटाळून आमचा दिव्यांग शासकीय सवलती घेण्यापासून वंचित राहात आहे. अशा बऱ्याच योजना घेण्यापासून जिल्हातील दिव्यांग असणारा लाभार्थी कोसो दूर आहे. आज जिल्हात दीड लाख दिव्यांगांची संख्या असूनही फक्त एकोणीस हजार दिव्यांगाची मतदार नोंदणी झालेली आहे. ही एक खेदाची बाब म्हणावी लागेल. आजही समाजात खरे दिव्यांग योजनेपासून दुर्लक्षित राहून ज्यांच्याकडे खोटे प्रमाणपत्र आहेत. असे लोक दिव्यांगांच्या टाळूवरील लोणी खाण्यात माहीर झाले आहेत. तेच आज समाजत रुबाबात फिरत आहेत.

दिव्यांग मतदार व आधार कार्ड नोंदणी अभियान जिल्हाभर राबविण्यात यावे, दिव्यांगांसाठी विशेष शिबीराचे आयोजन करावे, या मागणीचे निवेदन दिव्यांग विकास आघाडीच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना देण्यात आले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे, उपाध्यक्ष महेश विभुते आदि.

येत्या काही दिवसात तालुकानिहाय दिव्यांगांच्या मतदार व आधार कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात यावे. जेणे करून जास्तीत जास्त दिव्यांग समाजाच्या प्रवाहात येतील. तरी आमच्या निवेदनाचा सहानभूतीपूर्वक विचार व्हावा, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी वसंत शिंदे म्हणाले, आज दिव्यांगांच्या आधार व मतदार अडचणी संदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे. त्यांनी या संदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. ज्या दिव्यांग बंधू-भगिनींना मतदार व आधार नोंदणीसाठी काही अडचण येत असल्यास दिव्यांग विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन केले.

दिव्यांग विकास आघाडी पदाधिकारी, जिल्हा अध्यक्ष वसंत शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष ईश्वर गुंड, जिल्हा सचिव संतोष शेंडगे, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत काळे, नगर तालुका अध्यक्ष श्रीकांत काळे, महिला जिल्हा अध्यक्षा आशाताई गायकवाड, महिला उपाध्यक्षा, काळेताई, महेश विभुते, कैलास शेलार यासाठी आदि प्रयत्नशिल आहेत.

सविताबाई नंदाल यांचे दीर्घ आजाराने निधन

नगर – येथील पाईपलाईन रोड भागातील सिमला कॉलनीत राहणाऱ्या सविताबाई बलराम नंदाल (वय ४९) यांचे २५ जुलै रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, मुलगा, मुलगी, सुन असा परिवार आहे. बालाजी नंदाल यांच्या त्या मातोश्री होत.

शेख सिराजोद्दीन यांचे निधन

नगर – मुकुंदनगर येथील रहिवाशी शेख सिराजोद्दीन फजलोद्दीन (वय ८२) यांचे नुकतेच निधन झाले. ते रेल्वेतून कार्यालयीन अधीक्षक म्हणून निवृत्त झाले होते. रेल्वेच्या सेवेत जाणे अगोदर ते नगरम धील एटीयू, चॉंद सुलताना हायस्कुल येथे अध्यापक म्हणून कार्यरत होते. जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष शेख रियाज यांचे ते थोरले बंधू होत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुली, भाऊ, बहिणी व नातवंडे असा परिवार आहे. जलालशाह बुखारी कब्रस्तान येथे त्यांचा दफनविधी पार पडला.

राजेश पठारे यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर – येथील रहिवासी, यूझीएस फायनान्स कंपनीतील कर्मचारी राजेश मनोहर पठारे (वय ४०) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, बहीण, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. सेवानिवृत्त सेल्स टॅक्स ऑफिसर मनोहर चंद्रकांत पठारे यांचे चिरंजीव, मोरगेवस्ती येथील मनोज व रोहित दिलीप थोरात तसेच अलोक आसाराम थोरात यांचे मेहुणे, विलास माधाडे यांचे श्यालक होत.

शेतात विजेचा शॉक बसून युवा शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी जेऊर येथील महावितरणच्या कार्यालयाबाहेर केलेली गर्दी छायाचित्रात दिसत आहे.

शेतात विजेचा शॉक बसून युवा शेतकऱ्याचा मृत्यू

महावितरणाच्या हलगर्जीपणामुळे दुर्घटना घडल्याचा नागरिकांचा आरोप

नगर – शेतातील विहीरीवर वीज पंप चालू करण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील जेऊर गावात गुरुवारी (दि. २५) घडली. रवींद्र बाळासाहेब पाटोळे (वय ३७, रा. बहिरवाडी, जेऊर) असे या शेतकऱ्याचे नाव आहे. दरम्यान, संतप्त गावकऱ्यांनी महावितरणाच्या हलगर्जीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप करत रवींद्र यांचा मृतदेह महावितरण अधिकाऱ्याच्या टेबलावर ठेऊन निषेध व्यक्त केला. यावेळी गावकरी आक्रमक झाले होते.

खांबात वीज प्रवाह येत असून तो दुरूस्त करण्यात यावा अशी तोंडी तक्रार शेतकरी रवींद्र बाळासाहेब पाटोळे यांनी दोन ते तीन दिवसांपूर्वी महावितरण कार्यालयाकडे केली होती. मात्र महावितरणकडून दुरूस्तीचे काम करण्यात आले नव्हते. शेतकरी पाटोळे हे आपल्या शेतात विद्युत मोटार चालू करण्यासाठी गेले असता विजेचा धक्का लागला. त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

जेऊर येथील ग्रामस्थांनी महावितरणाच्या कारभाराचा निषेध व्यक्त करत पाटोळे यांचा मृतदेह ताब्यात घेऊन जेऊर येथील महावितरणाच्या कार्यालयात अधिकाऱ्याच्या टेबलावर ठेवला.

यावेळी ग्रामस्थ आक्रमक झाले होते. विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची जेऊर येथील ही चौथी घटना आहे. तक्रार देऊनही दखल घेतली गेली नसल्याने युवा शेतकऱ्याला आपले प्राण गमवावे लागले असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे असून महावितरणाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करण्यात आला आहे. यावेळी गावकऱ्यांनी गर्दी केली होती.

बांधकाम कामगारांची धरणे आंदोलन आ.प्राजक्त तनपुरेंच्या मध्यस्थीने स्थगित

बांधकाम कामगारांना ग्रामसेवकांनी ९० दिवसाचे प्रमाणपत्र देण्याचे बंद केल्याच्या निषेधार्थ बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने पंचायत समिती समोर गुरुवारी (दि. २५) धरणे आंदोलन सुरु केले होते. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री तथा आमदार प्राजक्त तनपुरे यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन मध्यस्थी करत ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांच्याशी चर्चा करून सदर प्रश्न सोडविण्यासाठी सूचना केल्या. सकारात्मक चर्चेनंतर सदरचे आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती संघटनेचे सरचिटणीस नंदू डहाणे यांनी दिली.

या आंदोलनात राहुरी तालुक्यातील बांधकाम कामगार सहभागी झाले होते. बांधकाम कामगारांना ९० दिवसाचे प्रमाणपत्र देण्याचे बंद केल्याने राहुरी तालुक्यातील हजारो बांधकाम कामगार नूतनीकरण व नोंदणी पासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे बांधकाम कामगार यांना मंडळाकडून मिळणाऱ्या योजनांचा लाभ मिळणे बंद झाले आहे.

बांधकाम कामगारांना मंडळाकडून मिळणाऱ्या योजनांचा लाभ मिळण्यासाठी नोंदणी होणे आवश्यक असून, यासाठी ९० दिवसाचे प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आलेले असताना हे प्रमाणपत्र मिळण्यासाठी कामगारांनी आंदोलन केले होते. आमदार तनपुरे यांच्या शिष्टाईने बऱ्याच दिवसापासून प्रलंबित असलेला ९० दिवसाच्या प्रमाणपत्राचा प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तर संघटनेच्या वतीने करण्यात आलेल्या आंदोलनाला यश आले आहे.

या आंदोलनात राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) उपाध्यक्ष विलास गागरे, आप्पासाहेब जगधने, अमोल शिंदे, अंबादास कोळसे, प्रकाश आंबेकर, शंकर आंबेकर, प्रवीण कांबळे, आकाश वायाळ, नितेश मुसळे, राहुल भालेराव, ओंकार वायाळ, अनिल शिंदे आदी सहभागी झाले होते.

गृहिणी

आरोग्य

ॲसिडीटी टाळण्यासाठी

* जेवताना हळूहळू आणि प्रत्येक घास चावून खावा. दुपारी जेवून लगेच आडवे होण्याने हमखास ॲसिडीटी वाढते. त्यामुळे दुपारची वामकुक्षी टाळावी. रात्रीचे जेवण लवकर करावे. जेवणानंतर ३ तासांनी झोपावे. रात्री खूप उशिरा जेवू नये.
* दिवसभराचा थकवा घालवण्यास ब्लॅक टी फायदेशीर आहे. डायबिटीजचा धोका कमी होतो. तणावापासून बचाव होतो. ब्लॅक टीमुळे पचनक्रिया व्यवस्थित होते.

अन्य पेयांच्या तुलनेत ब्लॅक टीमध्ये कॅफीनची मात्रा कमी असते. ज्यामुळे रक्तप्रवाह सुरळीत राखला जातो.

पाककला

पकांबा

साहित्य – साखर २ वाट्या, ओले खोबरे १ वाटीभर, लिंबाचा रस १ मोठा चमचा, हापूस आंब्याचे सोलीव तुकडे २ वाट्या.

कृती – साखरेचा १ तारीपेक्षा किंचित घट्ट पाक करावा. त्यात ओले खोबरे घालून दोन उकळ्या आणाव्या. मग खाली उतरून गार झाल्यावर त्यात आंब्याचे तुकडे घालून लिंबाचा रस घालून मिसळावा. पोळीबरोबर, पुरीबरोबर एक छान पटकन होणारा गोड पदार्थ होतो. उपासालाही चालतो.

सौंदर्य

चेहऱ्याच्या सुंदर त्वचेसाठी

* जर चेहऱ्यावर डाग असतील तर मुलतानी मातीत चंदन पावडर, चिमूटभर हळद व २–३ थेंब कापराचे तेल टाकून चेहऱ्यावर लेप लावल्यास हळूहळू डाग नाहीसे होतात.
* चेहर रुक्ष असेल तर २ चमचे ताजी मोहरी वाटून त्यात १ चमचा दूध व चिमूटभर हळद मिसळून पेस्ट बनवून लावा व १० मिनिटांनंतर चेहरा धुवा.

वास्तू

* जेवणाच्या खोलीचा रंग शांत आणि शीतलता प्रदान करणारा असावा.
* जेवणाच्या खोलीच्या दरवाजावर फुलांचे चित्र लावावे.

सल्ला

* हातापायाला भेगा पडल्यास जुने तूप लावा.
* बटाटे आणि कांदे एकत्र ठेवल्यास बटाटे लवकर खराब होतील.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

शनिवार, दि. २७ जुलै २०२४

---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, रेवती १३:००, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

राशिभविष्य

मेष : तीव्र वेगाने टाकलेली पावले आपणास प्रतिस्पर्ध्यांकडे ओढतील. आपल्या एखाद्या जवळच्या मित्राला संताप येईल, असे कही बोलाल. काही नवीन संधी मिळतील. निर्णय घेण्यापूर्वी दोनदा विचार कराल.

वृषभ : महत्वाची बातमी मिळाल्याने आनंदित राहाल. पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास मिळेल. राजकीय व्यक्तींना काळ अनुकूल आहे. राजकारणी व्यक्तींना उद्देशात यश मिळेल.

मिथुन : अनुकूल ते सहकार्य मिळेल. वेळेचा सदुपयोग केल्याने लाभ मिळेल. अधिक व्यय राहाल. कौटुंबिक सुख वाढेल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. शत्रू पराजित होईल.

कर्क : कामात व्यस्तता अधिक असल्याने आरोग्यावर विपरीत प्रभाव पडू शकतो. मित्रांचे सहकार्य मिळाल्याने महत्त्वाची कार्य पूर्ण होतील. व्यापार–व्यवसाय सुरळीत राहाणार नाही.

सिंह : आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील. कौटुंबिक आनंदाचे वातावरण राहील. मिळकतीपेक्षा अधिक खर्च होईल. एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर वेळ घालवू शकता.

कन्या : कामासाठी प्रवासाचे योग संभवतात. शत्रू वर्गाचे डावपेच वाया जातील. मागील उधारी वसुल होईल. गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल. नोकरदारांना अनुकूल वातावरण मिळेल.

तूळ : आरोग्याची काळजी घ्या. वाहने काळजीपूर्वक चालवा. आपल्या व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगा. कौटुंबिक वाद–विवाद टाळा. लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

वृश्चिक : शत्रूंपासून सावध राहा. व्यापार–व्यवसायात देवाण–घेवाण टाळा. मुले त्रास देऊ शकतात. उद्योगात गुंतवणूक केल्यास आर्थिक नफा मिळेल. पोरकटपणा करणे टाळा.

धनु : मागील उधारी व उसनवारी वसुल होईल. कार्यालयीन कामात वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. अधिकाऱ्यांविरूद्ध जावू नका. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही.

मकर : शत्रूंपासून सावध राहा. व्यवसायासाठी उत्तम वेळ. नवीन कामात यश मिळेल. आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रीतीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

कुंभ : आजच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक समासदांचा सहयोग घ्या. शत्रू प्रभावहीन पडतील. अपेक्षित व्यक्तींचे सहकार्य मिळेल.

मीन : त्याचप्रमाणे जुन्या मित्र–मैत्रिणींची भेट होईल. आज रात्री विश्रांती घ्या. इतर लोकांना आपल्या स्वतःची इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

शब्दगंध क्र. ६९७५

सौ.शैलजा कुलकर्णी

आडवे शब्द :– १) ज्याच्याशी संग करू नये असा ३) अळणी; बेचव; पाणचट ६) प्रमाण; मोज; गणित; मेजरमेंट ७) जिल्ह्याचे ठिकाण असलेले विदर्भातील एक शहर ९) प्रवेश करणे; पाय ठेवणे १०) शेतीचे एक अवजार ११) शंकराची पत्नी; पार्वती १३) उजळ रंगाचा; गौरवर्णीय १४) देश सोडून पळून गेलेला १७) एकामागून एकाला पकडण्याची पोलिसांची कारवाई २०) पक्का बांधलेला रस्ता २१) एक तंतुवाद्य

उभे शब्द :– १) असंख्य; अगणित; अनंत; अपार २) धन; संपत्ती; वित्त ३) सारखा; समान; बरोबर ४) पराजय; हार; असफलता; अपयश ५) मिठी; आलिंगन ७) नोकदार; टोकदार ८) वातावरत; बोजवारा ११) न खाण्याचे व्रत; लंघन १२) वृष्टी; वर्षाव १५) एक ज्वालाग्राही पदार्थ १६) आकडा; मांडी; संख्या १८) मागमूस; शोध; तपास १९) लहान डबा

शब्दगंध क्र. ६९७४ चे उत्तर

फिल्मीचक्कर क्र. ९१४८ चे उत्तर



मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : प्रार्थना म्हणजे धर्माचा स्तंभ आणि स्वर्गाची गुरुकिल्ली आहे. **– महंमद पैगंबर.**

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

हृदयाचे ठोके किती पडायला हवेत?

छातीवर हात ठेवल्यास आपल्याला हृदयाच्या आकुंचन–प्रसरणाची जाणीव होते. छातीला कान लावून वा स्टेथोस्कोपने आपण हृदयाचे ठोके ऐकू शकतो. हृदय किती वेळा आकुंचनप्रसरण पावते, म्हणजेच हृदयाचे किती ठोके पडतात हे मोजूही शकतो. हृदयातील रक्तदाब हा सर्व रक्तवाहिन्यात पोहोचत असल्याने धमन्यांवर बोट ठेवले तर त्या विशिष्ट लयीत वर खाली होताना जाणवतात. सामान्यतः मनगटातील धमनी हाताला लागण्याचा दर (नाडीचा दर) हा हृदयाचा ठोक्यांइतकाच असतो. सामान्यपणे हृदयाचे दर मिनिटाला ६० ते १२० इतके ठोके पडतात. मात्र खेळाडूंमध्ये विश्रांतीच्या अवस्थेत हा दर ४० इतका कमी व खूप वेगवान खेळ करत असताना १८० ते २०० इतका जास्त असू शकतो. मात्र विश्रांतीच्या अवस्थेत हृदयाचे ठोके मिनिटाला १२० पेक्षा जास्त असणे हे रोगाचेच लक्षण समजावे लागेल.

सामान्यपणे व्यायाम व मेहनतीची कामे करताना, खूप घाबरल्यास, मानसिक ताण पडल्यास वा अंगात ताप असल्यास छातीचे ठोके वाढतात. फुफ्फुसात द्रव गेल्याने होणारा न्यूमोनिया, गळ्यातील थायरॉईड ग्रंथीचे थॉयरॉक्सीन हा स्राव जास्त निर्माण करणारे विकार, हृदयाच्या गतीवर नियंत्रण ठेवणाऱ्या केंद्राचा विकार, मेंदू सांसर्गिक रोग, रक्तातील ल्युकोजचे कमी झालेले प्रमाण या सर्वांमुळे हृदयाचे ठोके वाढतात. हृदयाचे ठोके खूप वाढल्याने छातीत धडधडल्यासारखे होते व जीव घाबरा होतो. असे झाल्यास त्वरित तज्ञांचा सल्ला घ्यावा व हृदयाचे ठोके का वाढले आहेत. ते शोधून उपचार सुरु करावेत.

भलतच साहस

एका नदीच्या पाण्यात एक मासा राहत होता. तो पराक्रमी, बलवान आणि सौंदर्यशाली असल्यामुळे इतर मासे त्याला मान देत आणि त्याला भिऊन वागत. पण तो समाधानी नव्हता. या टिचभर राज्यात राहण्यापेक्षा मोठ्या राज्यात जाऊन तेथे राज्य करावे, मोठा मान मिळवावा, असे त्याला वाटले असता त्याने समुद्री प्रदेशात जायचा बेत पक्का केला. मग पोहत पोहत बऱ्याच दिवसांनी तो समुद्र नावाच्या मोठ्या राज्यात पोहचला.

तेथे जाताच त्याने इकडे–तिकडे फेरफटका मारला आणि सर्व माशांना बोलवून सांगितले,

''अरे, आजपासून तुम्ही माझ्या हुकमाखाली राहिले पाहिजे. मी तुम्हा सर्वांचा राजा असून माझ्या आज्ञेचा भंग कोणी केला, तर त्याला फाशीची शिक्षा देण्यात येईल.''

त्याचे हे उर्मट आणि गर्वाचे भाषण ऐकून समुद्रातील एक मासा मनात म्हणाला,

''हा कोण टिकोणीवरच? काल नाही आला, तोच आमच्यावर राज्य करण्याचे स्वप्न बघतो. याला धडा शिकवलाच पाहिजे.'' असा विचार करून तो मासा रागाने धावून त्याच्या अंगावर गेला.

हे सर्व पाहून नदीचा मासा घाबरला आणि आपला प्राण वाचविण्यासाठी आपल्या पूर्वीच्या प्रदेशाकडे धावत निघाला. समुद्रातील मासा त्याचा पाठलाग करीतच होता.

अखेर जेव्हा नदीच्या हद्दीत तो पोहोचला तेव्हा समुद्री माशाने त्याला सोडून दिले. तेव्हापासून समुद्री माशांवर राज्य करण्याचे स्वप्न त्याने कधी पाहिले नाही.

तात्पर्य : आपली कुवत, आपले सामर्थ्य याचा विचार न करता जो भलतेच अतिरेकी साहस करण्याचा प्रयत्न करतो, त्याच्या पदरी निराशा येते.

जीवन चक्र

तसे संसारातील आमचे घ्यान हटविले तर आम्ही शाश्वत मुक्ती मिळवू शकतो. ध्यान–धारणा करून सर्व संसारीक मोह आणि इच्छांना आम्ही सोडायला शिकलो तर आम्ही स्वतःला मुक्त करू शकू आणि परत परमात्म्याकडे झेप घेऊ शकू. एका वृद्ध कावळ्याविषयी एक पुरातन कथा आम्हांस सांगते की, त्या कावळ्यास तहान लागली होती, म्हणून तो जंगलात भटकत होता. तो अनेक दिवसापासून तहानलेला होता. शेवटी त्यास एक घागर दिसली, जिच्या तळाला थोडेसे पाणी होते. कावळ्याने आपली चोच त्या घागरीत टाकली परंतू पाण्याच्या तळापर्यंत तो पोहचू शकला नाही. सुरुवातीला त्याला समजेना की काय करावे? त्याला वाटले आता आपणास पाणी मिळणार नाही. तेव्हा त्याला एक उपाय सुचला. त्याने घागरीमध्ये एक–एक करून लहान–लहान खड्डे टाकण्यास सुरुवात केली. एक खडा घागरीत पडत असे तेंव्हा तळातील पाणीवर येत असे. एक–एक करून तो खडे घागरीत टाकत राहिला. काही वेळेपर्यंत हा प्रयत्न निरर्थक वाटला, कारण की, अजुनही तो पाण्यापर्यंत पोहचू शकतो नव्हता. परंतु जेव्हा त्याने अनेक खड्डे घागरीत टाकले, तेव्हा पाणी वर आले आणि कावळ्याने पाणी पिवून आपली तहान क्षम विली (भागविली).

वरील कावळ्याच्या कथेप्रमाणेच आम्ही ध्यानअभ्यासाकरता जो वेळ देतो, त्याप्रमाणे आहे. सुरुवातीला आम्ही ध्यानधारणेकरीता जो एक तास देतो, तेंव्हा आम्ही काहीही प्रगती करीत नसून आम चा तो तास वाया गेला असे आम्हास वाटते. परंतु सुरुवातीच्या काळामध्ये आम्हास परिणाम दिसून येत नाही. शेवटी अशाप्रकारे नियमानुसार ध्यानधारणेस दिलेली वेळ एकत्र होते आणि आम्हास असे दिसून येते की आपली ध्यानधारणेस वेगाने प्रगती होण्यास सुरुवात झाली आहे. आम्ही ध्यानधारणेमध्ये केव्हाही निराश होऊ नये. ध्यानधारण चालुच ठेवावी. आम्ही, धानाभ्यासात दृढतेने, दिर्घकाळ लागून राहिले पाहिजे. असे केल्याने एक दिवस आम्ही आश्चर्यचकीत होऊ कारण आध्यात्माचे अमृतजल वरती येईल व आम्ही ते मनसोक्त पिऊ.

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

हरिनाथ भाई, उम्र ५५ वर्ष, चित्तुर

मैं काफी सालों से कृषि का व्यवसाय कर रहा हूँ। पिछले १० साल से ज्ञान में चल रहा हूँ। हमारे यहाँ पर १०० एकड़ जमीन में किस्म–किस्म के आम के पेड़ हैं जैसेकि तोतापुरी आदि, तो जब से शाश्वत यौगिक खेती के बारे में सुना तो सन २०१२ में संकल्प आया कि बाबा के लिये हमारे गाँव में एक घर बनाकर सेवार्थ देना है। मैं अपनी खेती में हर रोज़ जाता था, गाँव से खेती लगभग ७५ कि.मी. दूर होने के कारण एक ही बार १० भाई–बहनों का ग्रुप आया था। वहाँ पर सबने मिल करके एक घण्टा पॉवरफुल योग किया और संकल्प किया कि इस खेती की आमदनी से बाबा का घर बनेगा। फिर मैं रोज़ खेती में यही संकल्प दोहराता रहा। पूरी खेती में पेड़, पौधों को शान्ति का दान देता रहा। पवित्र ऊर्जा से वातावरण को शुद्ध शक्तिशाली बनाने का अनुभव किया। आम में जो कीट निर्माण होते थी वे इस बार नहीं हुई और अच्छे आम निकलें। बाबा का ही कमाल कहें या शाश्वत यौगिक खेती का कमाल कहें, पेड़ों को मेरी बात समझ में आयी और अच्छी भी लगी इसलिए कमाल की यानी उम्मीद से ज्यादा फसल मिली और उस साल आम के दाम भी बढ़ गये थे। फलों की क्वालिटी देखकर फैक्ट्रीवालों ने अच्छे दामों में खरीदे। तो उसी वर्ष मैंने उन्हीं आम दनी से दो मंजिल का घर बनाकर बाबा की सेवा के लिए संस्था को समर्पित कर दिया। मुझे बहुत आश्चर्य हुआ है कि पेड़–पौधे अपने मालिक से गहरा सम्बन्ध रखते हैं और सहयोग भी अच्छा देते हैं।

सेल्वी भाई, उम्र ६५ वर्ष, चित्तुर

मैं तीन साल से ज्ञान में चल रहा हूँ। मेरा परिवार बहुत गरीबी में गुजर रहा था क्योंकि केवल कृषि पर आधारित है। ५०–५० फुट का एक छोटासा जमीन है उसमें मैंने टमाटर बोये थे, तो शाश्वत यौगिक खेती के बारे में बहनों ने समझ दी। तब मैंने अच्छी तरह से समझ करके अटूट विश्वास के साथ काम किया और रोज़ योग करता रहा। गरीबी के कारण खेती में मैंने कुछ भी खर्चा नहीं किया, मैं अकेला ही काम करता था तो सचमुच कमाल है बाबा की, जो तीन गुना ज्यादा उपज मिली। तब से बाबा के ऊपर और इस शाश्वत यौगिक खेती की पद्धति पर मेरा विश्वास स्थिर हो गया। बाबा की कृपा से मेरी गरीबी दूर होती जा रही है। धन्यवाद।

गोपम्मा माता, उम्र ६५ वर्ष, सालाबाद

मैं जि.कड़प्पा की निवासी हूँ, पिछले १० सालों से ज्ञान में चल रही हूँ और मेरी बेटी खेती करती है, मेरे दामाद को बाबा पर इतना विश्वास नहीं है। पिछले साल ०.७५ एकड़ की जमीन में रजनीगंधा लगाया है, बहुत यूरिया डाल रहे थे। फिर भी दिन में २ किलो या ३ किलो फूल ही मिल रहे थे। मैंने यहाँ की बी.के.राजेश्वरी बहन को अपना यह सारा हाल बताया। तो वे स्कूल के लिये आते वक्त हर रोज़ यहाँ योग करने लगी। यही संकल्प था कि यहाँ के लोगों को बाबा का सन्देश देना है

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक – ''सत्यवान हरिश्चंद्र कशासाठी प्रसिद्ध आहे?''

विद्यार्थी – ''ते नेहमी खरे बोलत असत.''

शिक्षक – ''मग, त्यांच्याकडून आपल्याला कोणता बोध मिळतो?''

विद्यार्थी – ''नेहमी खरे बोलावे!''

इतक्यात दुसरा विद्यार्थी बाजूच्या मुलाला म्हणाला,

''जर खरं बोलल्यामुळे हरिश्चंद्राला मार खावा लागला असता, तर तो खरं बोलायला नक्की विसरला असता!''

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



हे सूर्यदेवा
मी तुझे गाणे कसे आळवू
चिमुकले फूल म्हणाले,
तुझ्या निर्मांतपणातून
व तुझ्या शुद्धतेतून सूर्यदेव म्हणाला

मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर

मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,

पिंगार मो. ९४०३७३४२८१

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

ही सर्वच लक्षणे प्रत्येक स्त्रीमध्ये दिसतील असे नाही. यातील कही लक्षणे थोडयाशाच फरकाने दिसतात. काही स्त्रियांमध्ये लक्षणांची तीव्रता जास्त; तर काहींमध्ये कमी असते. बरेचदा बाळंतपणानंतर वजन वाढते. म्हणून या लक्षणांकडे दुर्लक्ष केले जाते. चाळिशीच्या पुढे रजोनिवृत्ती येताना स्त्रियांमध्ये अशाच प्रकारची लक्षणे दिसतात. त्यामुळेही हायपोथायरॉडीझमकडे आपोआप दुर्लक्ष होते. अशतपणा, थकवा जाणवणे, अंग दुखणे, विस्मरण होणे. यांमुळे रुग्ण टॉनिकच्या गोळ्या किंवा औषधे घेतात. परंतु निदान न झाल्यामुळे स्त्री रुग्णांचे वजन अजूनच वाढू लागते. किल्येक वर्ष हे दुष्टचक्र चालू राहते. असे होऊ नये म्हणून डॉक्टरांच्या सल्ल्याने वेळीच थायरॉइड रक्त तपासणी करून घ्यावी.

हायपोथायरॉइडचे निदान कसे करावे?

याकरिता रक्ताची तपासणी करावी लागते. रक्तामधून T3, T4, TSH चे प्रमाण तपासले जाते. हायपोथायरॉइडमध्ये TSH चे प्रमाण वाढलेले असते, तर T3 आणि T4 या अंतःस्रावाचे प्रमाण कमी झालेले असते.

हायपोथायरॉडीझम असणाऱ्या गर्भवतीची गर्भावस्थेत घ्यावयाची काळजी गर्भवतीला हायपोथायरॉडीझम असल्यास तिची जास्त काळजी घ्यावी लागते. थायरॉक्सिन या गोळीची मात्रा अचूक ठेवण्यासाठी साधारणत: प्रत्येक दोन–तीन महिन्याने थायरॉइडची रक्त तपासणी करावी लागते. गर्भावस्थेमध्ये T3, T4 अंतःस्रावांची कमतरता निर्माण झाली, तर बाळाच्या शारीरिक व मानसिक वाढीवर परिणाम होतो. बऱ्याच वेळेला बाळाची शारीरिक वाढ चांगली असली तरी मतिमंदत्व येऊ शकते. सोनोग्राफीमध्ये फक्त शारीरिक वाढ योग्य आहे किंवा नाही हे लक्षात येते. परंतु मतिमंदत्व लक्षात येत नाही. म्हणून गर्भावस्थेत स्त्रीरोगतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाबरोबरच फिजिशियन डॉक्टरांचेही मार्गदर्शन घ्यावे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे व उपचारामुळे बाळाची शारीरिक व मानसिक वाढ योग्य होते.

प्रसूतीनंतर होणारा हायपोथायरॉडीझम प्रसूतीनंतर चुकीचा आहारविहार, अति मानसिक ताण यांमुळे थायरॉइड ग्रंथीमधून T3, T4 हार्मोन्सची निर्मिती कमी प्रमाणात होते.

– डॉ. शारदा निर्मल–महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

लायन्सच्या माध्यमातून समाजात सत्पात्री दान

डॉ. एस. एस. दीपक यांचे प्रतिपादन

नगर – समाजातील गरजूंना आधार देण्याचे काम लायन्स क्लब करत आहे. यामधील महिला देखील महिला सक्षमीकरणाती योगदान देत आहेत. लायन्सच्या माध्यमातून समाजात सत्पात्री दान होत असून, या सामाजिक योगदानाने समाज सावरला जात असल्याची भावना डॉ. एस. एस. दीपक यांनी व्यक्त केली.

लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांचा संयुक्तिक पदग्रहण सोहळा शहरात पार पडला. या पदग्रहण सोहळ्यात अध्यक्षीय भाषणात डॉ. दीपक बोलत होते. उपप्रांतपाल राजेश अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या पदग्रहण सोहळ्यात लायन्सच्या अध्यक्षपदाची डॉ. अनघा पारगावकर व लिओ क्लबच्या अध्यक्षपदाची सुत्रे रिधिमा गुंदेचा यांनी स्विकारली. या सोहळ्यासाठी किरण भंडारी, प्रशांत मनोत, अरविंद पारगावकर, आनंद बोरा, डॉ. अमित बडवे, नितीन मुनोत, सुनील छाजेड, संदेश कटारिया, कमलेश भंडारी, जस्मितसिंग वधवा, राजवीरसिंग संधू, दिलीप कुलकर्णी, प्रणिता भंडारी, सौ. सुकाळे, प्रशांत गाडेकर, ऋषी सुकाळे, वायकर, अर्चना माणकेश्वर, सुमित लोढा आदींसह लायन्स व लिओ क्लबचे सदस्य उपस्थित होते.

पुढे डॉ. दीपक म्हणाले की, सध्याची तणावपूर्ण जीवनशैली निर्माण झाली आहे. आनंदी जीवन जगणे हरवले असून, आत्महत्या वाढत आहे. आत्महत्या रोखण्यासाठी देखील सामाजिक चळवळीना कार्य करावे लागणार आहे. कोरोना काळात घर घर लंगर सेवेचे अन्नदान गरजूंना अमृत ठरले. लायन्सच्या सेवा कार्यात नेहमीच सहकार्य राहणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्मृती कुलकर्णी या विद्यार्थिनीने गणेश वंदना सादर केली. प्रिया बोरा व अरमान खंडेलवाल यांनी लायन्स ध्वजाला मानवंदना दिली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पाहुण्यांचे रोप देऊन स्वागत करण्यात आले. डॉ. संजय असनानी यांनी प्रास्ताविकात लायन्सचे घर घर लंगर सेवेत सुरु असलेल्या सामाजिक योगदानाची माहिती दिली. तर मागील वर्षी गरजूंसाठी उभारलेले डेंटल क्लिनिक व १११ विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी सायकल वाटप करण्यात आल्याचे सांगून, सध्या शाळा सुरु झालेल्या असताना शहरासह ग्रामीण भागात स्कूल बॅगसह शैक्षणिक साहित्य वाटप सुरु असल्याचे स्पष्ट केले.

लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लब ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षपदाची सूत्रे डॉ. अनघा पारगावकर व रिधिमा गुंदेचा यांनी स्विकारली. याप्रसंगी उपस्थित क्लबचे पदाधिकारी व सदस्य.

डॉक्टर अनघा पारगावकर व रिधिमा गुंदेचा यांनी स्विकारली अध्यक्षपदाची सुत्रे

मावळते अध्यक्ष धनंजय भंडारे यांनी मागील वर्षातील कार्याचा आढावा सादर करताना घरापासून लांब असलेल्या शाळेत जाण्यासाठी मुला–मुलींना तब्बल ११९ सायकल वाटप करण्यात आले. सर्वसामान्य घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याकरिता विशेष उपक्रम राबवून समाजाला गरज असलेल्या काय्म स्वरुपातील प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आल्याची त्यांनी माहिती दिली. लिओ क्लबच्या मावळत्या अध्यक्षा आंचल कंत्रोड व दिशा तलवार यांनी मागील वर्षातील विविध सामाजिक उपक्रमाचा आढावा घेतला.

राजेश अग्रवाल म्हणाले की, २०० पेक्षा जास्त देशात लायन्स क्लबची सामाजिक चळवळ सुरू आहे. ५० हजार क्लब असून, संपूर्ण जगात त्याचे सदस्य आहेत. जुलै या महिन्यात सर्व क्लबचा पदग्रहण सोहळा होत असल्याची माहिती दिली. तर लायन्स व लिओ क्लबच्या पदाधिकाऱ्यांना त्यांच्या कार्याची जबाबदारी समजावून व पदाची शपथ दिली.

डॉ. अनघा पारगावकर म्हणाल्या की, या वर्षात पर्यावरण व आरोग्यावर काम केले जाणारे आले आहे. समाजात दोन्ही प्रश्न बिकट बनत चालले आहे. उन्हाळ्यात हेरपळून निघत असून, अनेक भागात पावसाळ्यात पूर परिस्थिती निर्माण होत आहे. चळवळीशी जोडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. युवा वर्ग तणावपूर्ण वातावरणात वावरत असताना त्यांचे मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले.

सुमित भुइड यांनी लायन्स क्लबने समाजसेवेचा ब्रॅण्ड निर्माण केला आहे. आपल्या क्षेत्रात यशस्वी झालेले व्यक्ती सामाजिक देणे या भावनेने या सामाजिक कार्यात योगदान देत असल्याचे स्पष्ट केले.

आशिष बोराबके यांनी नवीन कार्यकारणीस पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी शहरातील विविध लायन्स क्लबचे पधाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.

लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी डॉ. अनघा पारगावकर, सचिवपदी डॉ. सिमरन वधवा, खजिनदारपदी अंजली कुलकर्णी यांची तर लिओ क्लबच्या अध्यक्षपदी रिधिमा गुंदेचा, सचिवपदी रुचिता कुमार व खजिनदारपदी हर्षवर्धन बोरुडे यांची नियुक्ती जाहीर करुन त्यांना पदाची सुत्रे सोपविण्यात आली.

यावेळी केशवराव गाडीळकर शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. स्वागत नंदिनी तलरेजा, हरमनकौर वधवा यांनी केले. याप्रसंगी अभय मेस्री, डॉ. मानसी असनानी, डॉ. प्रिया मुनोत, अनिकेश सुकाळे, अर्पिता शिंगवी, पुरुषोत्तम झंवर, अजित शिंगवी, मुरलूरसिंग वधवा, जपप्रीत बग्गा, हर्ष किथानी, तमन्ना तलवार आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष मानकेश्वर व आरोही कांगे यांनी केले. आभार हरजितसिंह वधवा यांनी मानले.

जामखेड येथील जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत माऊंट लिटेरा झील स्कूलची विद्यार्थिनी कु. मानसी देशमुख हिने कांस्य पदक मिळविल्याबद्दल तीचा सत्कार करताना प्राचार्या शैलजा लोटके. समवेत अध्यक्ष सुनील लोटके व शिक्षक वर्ग.

जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत माऊंट लिटेरा झी स्कूलचे यश

नगर – जामखेड येथे आयोजित केल्या गेलेल्या अहमदनगर जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत माऊंट लिटेरा झी स्कूलमध्ये इयत्ता ८ वी मध्ये शिकणाऱ्या कु. मानसी देशमुख हीने ४० ते ४५ वजन गटातून कांस्य पदक पटकावून विजय संपादीत केला. तिच्या या यशाबद्दल शाळेत सत्कार समारंभाचे आयोजन केले गेले होते. शाळेचे अध्यक्ष सुनील लोटके, संचालिका व प्राचार्या शैलजा लोटके तसेच शाळेतील सर्व शिक्षक व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्या शैलजा लोटके यांच्याहस्ते कु. मानसी देशमुख हिचा मेडल देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी प्राचार्या शैलजा लोटके यांनी कु. मानसी देशमुख हिच्या यशाचे कौतुक केले. तसेच मानसीचे हे यश समाजातील सर्वच मुलींना प्रेरणादायी ठरेल व यामुळे जास्तीत जास्त मुली खेळात पुढे येतील असा विश्वास व्यक्त केला. तसेच सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणबरोबरच खेळ अंगीकारण्याचे आवाहन केले. मानसीच्या पालकांचेही आभार मानले. कु. मानसी देशमुख हिच्या यश संपादना करिता क्रीडा शिक्षक वसिम शेख यांचे मोलाचे योगदान लाभले.

श्री साईदास परिवार ट्रस्टच्यावतीने नगर ते शिर्डी पायी पालखी सोहळा

नगर – सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्रावणमासानिमित्त श्री साईदास परिवार ट्रस्टच्या वतीने अहमदनगर ते श्री क्षेत्र शिर्डी पायी पालखी १० ऑगस्ट रोजी सकाळी ७ वा. शमी गणपती मंदिर, दिल्लीगेट, नगर येथून निघणार आहे. पालखीत अंदाजे ५०० ते ५५० साईभक्त शिर्डीस पायी जाणार आहेत. ही पालखी १३ ऑगस्ट रोजी शिर्डीस पोहचणार आहे.

तरी दानशूर व्यक्तींनी या चार दिवसाच्या सोहळ्यासाठी यथाशक्ती अन्नधान्य स्वरुपात किंवा आर्थिक मदत करावी असे आवाहन साईदास परिवाराच्या वतीने करण्यात आली. संपर्कसाठी पवन नागरी पतसंस्था, शेरकरगल्ली, सर्जेपुरा, नगर येथे व प्रकाश म्हस्के (मो.९४२०७४७५६३), निशीकांत शिंदे (मो.९४२३४६४१९४), अजय काळे (मो.९८९०६७४३४९), संजय बनसोडे (मो.८२७५०३४१२७), शंकर बोरुडे (मो. ९८९०९५९५१६) या व्यक्तींशी संपर्क साधावा.

साई भक्तांनी या पालखी सोहळ्यात सहभागी होवुन शोभा वाढवावी, असे आवाहन श्री साईदास परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

मानसी डान्स स्टुडिओच्यावतीने मंगळागौर शिबिराचे आयोजन

नगर – सावेडी येथील मानसी डान्स स्टुडिओ च्यावतीने मंगळागौर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराची सुरुवात १ ऑगस्ट पासून एकविरा चौक, पाईपलाईन रोड आणि बालिकाश्रम रोड, नगर या तीन ठिकाणी सुरुवात होणार असून हे शिबीर महिनाभर चालणार असल्याची माहिती शिबिराच्या प्रशिक्षिका मानसी दवे यांनी दिली आहे.

मंगळागौरची सगळ्यांनाच उत्सुकता असते. यानिमित्त होणारे विविध नृत्य, खेळ याची तयारी करण्यासाठी मंडळांची जय्यत तयारी सुरू असते. वर्षभर घरकाम, आणि नोकरी यातून वेळ काढत महिला उत्सवात सहभागी होत असतात. यातून महिलांना आपले छंद जोपासण्याची तसेच आपले कलागुण सादर करण्याची संधी मिळते. त्यातच हल्लीच्या आधुनिक युगात आपण आपले सण–उत्सव, परंपरा विसरत चालली आहोत, त्यामुळे मंगळागौरच्या कार्यक्रमातून या सण–उत्सव, परंपराला उजाळा देण्याचे काम केले जाते. या शिबिरामध्ये मांगळागौर नृत्य, त्यातील वेगवेगळे खेळ आणि गाणी शिकवली जाणार आहे. या शिबिरात महिला, गृहिणी, नोकरदार महिलांना देखील सहभागी होता येणार आहे. तसे नोकरदार महिलांसाठी खास शनिवार आणि रविवारची बॅच देखील उपलब्ध असणार आहे.

यात महिलांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रशिक्षिका मानसी दवे यांनी केले आहे. नावनोंदणीसाठी सीमा देशमुख (मो.९६८९३ ५२०११), अर्चना शिंदे (मो.९६७७७७००२६), आणि प्रतिभा दवे (मो.९८८१५३१९८८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुढे जाण्यासाठी छोटया कंपनीपासून सुरुवात करून अनुभव घ्यावा

जयद्रथ खाकाळ यांचे प्रतिपादन; छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात रोजगार मेळावा उत्साहात

नगर – विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात रोल मॉडेल समोर ठेवावा व त्या दिशेने पुढे जाण्यासाठी त्यांचे व आपल्या वरिष्ठाचे मार्गदर्शन घ्यावे. शिक्षण पूर्ण केल्यावर मोठया कंपनीत जॉब भेटण्याची अपेक्षा असते, पण मिळत नाही. त्यासाठी आपण छोटया कंपनीपासून सुरुवात करून अनुभव घेतला पाहिजे. तुमच्याकडे अनुभव असेल तर कंपन्या तुमच्या मागे येतील. स्वतःचा व्यवसाय सुरु करायचा असेल तर सरकारने अनेक योजना उपलब्ध करुन दिल्या असून, त्याचा लाभ घ्यावा. प्रामाणिक काम करा आणि कोणत्याही कंपनीत काम करतांना स्वतःची असल्यासारखे काम केल्यास यश नक्की मिळणार असल्याचे जयद्रथ खाकाळ यांनी स्पष्ट केले.

नेप्ती येथील छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित रोजगार मेळाव्याप्रसंगी जयद्रथ खाकाळ. समवेत महेश इंदानी, प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे आदी.

असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज (आमी) आणि छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय नेप्ती यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यास युवक–युवतींचा प्रतिसाद लाभला. नेप्ती (ता. नगर) येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये हा रोजगार मेळावा पार पडला.

या रोजगार मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ व उपाध्यक्ष महेश इंदानी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने रोजगार मेळाव्याचे उद्घाटन झाले.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी महाविद्यालयात पार पडलेल्या भव्य रोजगार मेळाव्यामधून युवक–युवतींना रोजगारच्या संधी मिळणार असून, तर औद्योगिक क्षेत्रात असलेली गरज त्यांच्या लक्षात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याशी असे अनेक उपक्रम महाविद्यालयात सातत्याने राबविण्यात येत असून, भविष्यात देखील हे उपक्रम सुरु राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महेश इंदानी म्हणाले की, भारताच्या जेडीपी मध्ये सर्वात मोठा वाटा युवकांचा आहे. मी देशासाठी काय करू शकतो? याला महत्त्व देऊन काम केल्यास भविष्यातील वाटचाल उज्वल राहणार आहे. उद्योजक क्षेत्रात अनेक संधी असून, योग्य दिशेने पुढे जाण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

या रोजगार मेळाव्यात अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन क्षेत्रातील ८९ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. १५ इंडस्ट्रीजनी विद्यार्थ्यांचा मुलाखती घेऊन त्यांना विविध पदावर नियुक्त्या केल्या. यावेळी रिटेलवेयर या कंपनीचे नवनाथ लंके, सिद्धी ग्रुपचे एम.एस. बोचरे, पोलाद स्टीलचे आशिष भाबडा यांच्या समवेत विविध कंपनीचे एच.आर. उपस्थित होते. ट्रेनिंग अंण्ड प्लेसमेंट अधिकारी म्हणून प्रा. एस. एम. वाळके यांनी काम पाहिले. रोजगार मेळाव यशस्वी होण्यासाठी समन्वयक प्रा.ए.आर. माने, प्रा. एम.पी. आठरे, प्रा. जी.बी. साळुंके, प्रा. पी.डी. कोतकर आदींसह विभागप्रमुख व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. अक्षय देखणे यांनी केले. आभार प्रा.शिल्पा वाळके यांनी मानले.

मंगल भक्त सेवा मडळातर्फे ढवळपुरी (ता.पारनेर) येथील फकीरबाबा विद्यार्थी वसतीगृहातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

'फकीरबाबा विद्यार्थी वसतीगृहा'मध्ये मंगल भक्त सेवा मंडळाकडून वह्या वाटप

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अ.नगर या संस्थेच्या फकीरबाबा विद्यार्थी वसतिगृह, ढवळपुरी (ता. पारनेर) येथे १८ जुलै रोजी शैक्षणिक वर्ष इ. ५ वी ते १२ वी पर्यंतच्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट) च्या वतीने शालेय साहित्य स्वरुपात फूल स्केप वहयांचे वाटप मंडळाचे सेवेकरी किर्तीकुमार कोठारी, राजेंद्र आगरकर, बंटूनाना सप्रे, संतोष व्यवहारे यांचे हस्ते व मंडळाचे अध्यक्ष श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (श्री राजाभाऊ कोठारी) यांच्या मार्गदर्शनातून चालणाऱ्या विविध उपक्रमापैकी एक उपक्रम म्हणजे सामाजिक कार्य या भावनेतून करण्यात आले.

यावेळी वसतिगृहाचे अधिक्षक सुधाकर सुळे व सहकारी फारूख शेख तसेच विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी मंडळाचे सेवेकरी राजेंद्र आगरकर यांनी प्रातिनिधिक स्वरूपात गुरुवर्य भाउंचा सन्मान वसतिगृहाच्या वतीने फारूख शेख यांचेकडून स्विकारला. या प्रसंगी ढवळपुरी गावचे रहिवाशी व जुनिअर कॉलेजचे प्रा. सुनिल व्यवहारे यांचे विशेष सहकार्य लाभले.

वसतिगृहाचे फारूख शेख यांनी मंडळाकडून विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या शैक्षणिक साहित्याबद्दल मंडळास धन्यवाद दिले व पुढील काळात असेच सहकार्य लाभेल अशी आशा व्यक्त केली. विद्यार्थ्यांसाठी मंडळास सेवा करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आल्याबद्दल संतोष व्यवहारे यांनी विद्यालयाचे आभार मानले.

'जैन ओसवाल पंचायत सभा'अंतर्गत 'जॉईज'च्यावतीने 'स्नेह उत्सव २०२४'

३ ते ११ ऑगस्ट दरम्यान क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा, १५ ऑगस्ट रोजी पारितोषिक वितरण

नगर – जैन ओसवाल पंचायत सभेच्या जैन ओसवाल युवक संघाच्यावतीने जुडेंगे बढेंगे या मंत्रावर आधारित स्नेह उत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. यात ३ ते ११ ऑगस्ट दरम्यान विविध क्रीडा, सांस्कृतिक स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धा व उत्सवानिमित्त समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळाही आयोजित करण्यात आला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांनी व स्पर्धांकांनी आपला प्रवेश अर्ज २६ ते २९ जुलै पर्यंत दरम्यान सायंकाळी ५ ते रात्री ९ यावेळेत केशर गुलाब मंगल कार्यालय येथे जमा करायचा आहे. स्नेह उत्सवाचे यंदा १५ वे वर्षे आहे, अशी माहिती जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

मिनिस्टर कार्यक्रम मार्केट यार्ड मार्ग सिताबन लॉन्स येथे होणार आहे.

११ ऑगस्ट रोजी बॅडमिंटन स्पर्धा वाडिया पार्क क्रीडा संकुलात होणार आहे. तर केशर गुलाब मंगल कार्यालय येथे रांगोळी, सायन्स प्रोजेक्ट, चित्रकला, सुदृढ बालक, स्पेल ओ वेल, कॉन बनेगा जॉईज विजेता अशा स्पर्धा होणार आहे.

१५ ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजता केशरगुलाब मंगल कार्यालयात स्पर्धेचे पारितोषिक वितरण होणार आहे. याचदिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ६ यावेळेत रक्तदान शिबिर होईल. पारितोषिक वितरण समारंभावेळी मनोरंजन कार्यक्रम व लकी ड्रॉ कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती जॉईजचे अध्यक्ष प्रतिक बाबेल व सेक्रेटरी सचिन मुनोत यांनी दिली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जैन ओसवाल पंचायत सभा व जैन ओसवाल युवक संघ परिश्रम घेत आहे.

अधिकमाहितीसाठी संपर्क – ९७६७२३८४८५, ९८६००४१००४.

उपक्रमातून विद्यार्थ्यांची प्रगती साधली जात आहे

अजय ढोणे यांचे प्रतिपादन

नगर – सीताराम सारडा विद्यालयाच्या माध्यमातून सर्वसामान्य कुटूंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व आधुनिक शिक्षण देत आहे. विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांची चांगली प्रगती साधत आहेत. त्यामुळे या विद्यालयाच्या लौकिकात भर पडत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना काही अडचणी येऊ नये, त्यासाठी छोटीशी मदत देत आहोत. विद्यार्थ्यांनी शिक्षक व पालकांनी सांगितलेल्या गोष्टीं आत्मसात करुन शाळेचे व कुटूंबाचे नाव उज्वल करावे. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही कायम तत्पर राहू, असे अजय ढोणे यांनी सांगितले.

सीताराम सारडा विद्यालयात अजय ढोणे व निखिल ढोणे मित्र मंडळाच्यावतीने वह्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरिष मोडक, अजित बोरा, मकरंद खेर, मुख्याध्यापक विझल ढगे, चंद्रकांत बोरुडे, पियुष लुंकड, प्रविण ढोणे, अभिजित ढोणे, कैलास शिंदे आदि.

सीताराम सारडा विद्यालयात ढोणे मित्र मंडळाच्यावतीने वह्या वाटप

सीताराम सारडा विद्यालयात अजय ढोणे व निखिल ढोणे मित्र मंडळाच्यावतीने तुमारे तीन हजार वह्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरिष मोडक, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, विद्यालयाचे चेअरमन मकरंद खेर, मुख्याध्यापक विझल ढगे, चंद्रकांत बोरुडे, पियुष लुंकड, प्रविण ढोणे, अभिजित ढोणे, कैलास शिंदे आदि उपस्थित होते.

याप्रसंगी शिरिष मोडक म्हणाले, हिंद सेवा मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात असतात. शिक्षकांच्या सहकार्याने विद्यार्थीही अभ्यासाबरोबरच विविध स्पर्धा, परिक्षा, कला, क्रीडा प्रकारात यश संपादन करत आहेत, ही संस्थेच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब आहे. आज ढोणे मित्र मंडळाने विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्याचा चांगला उपक्रम राबविला आहे. विद्यार्थ्यांचा त्याचा फायदा चांगल्या पद्धतीने करुन यशस्वी व्हावे, असे सांगितले.

याप्रसंगी अजित बोरा यांनी विद्यार्थ्यांनी आयुष्यात खूप मोठे व्हा व शाळेचे नाव उज्वल करा अशा सदिच्छा व्यक्त केल्या. प्रा.मकरंद खेर यांनी बोलण्यापेक्षा कृती महत्वाची त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनीही आपले कर्तव्य कृतीतून दाखवावे, असे मत व्यक्त केले.

प्रास्ताविक मुख्याध्यापक विझल ढगे यांनी केले. परिचय व स्वागत रा.सू.कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन शितल शिंदे यांनी केले तर आभार अमोल कदम यांनी मानले. याप्रसंगी नि.मा.राहिंज, विजय कुलकर्णी, गणेश ताडला, प्रविण लोखडे, चार्लस चव्हाण आदि उपस्थित होते.

आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्य शिबिरांमुळे हजारो रुग्णांना दिलासा

संतोष गुगळे यांचे प्रतिपादन

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलचा नावलौकिक सर्वदूर पसरला आहे. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत आरोग्य सेवा मिळावी. यासाठी जैन सोशल फेडरेशनचे कार्यकर्ते अहोरात्र प्रयत्न करीत आहेत. धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. न परवडणारा औषधांचा खर्च यामुळे अनेक रुग्ण आरोग्य सेवेपासून वंचित राहतात. सर्वांना उत्तम आरोग्य सेवा मिळावी. या हेतूने आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिरे घेतली जातात. आनंदऋषीजी हॉस्पिटल्याच्या आरोग्य शिबिरांमुळे हजारो रुग्णांना दिलासा मिळत आहे, असे प्रतिपादन उद्योजक संतोष गुगळे यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना उद्योजक संतोष गुगळे. समवेत सचिन कटारिया, अभय गुगळे, सुभाष मुनोत, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, संतोष बोथरा आदी.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिरांमुळे मिळत आहे. तसेच आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवेच्या यशकुंडात खारीचा वाटा उचलत आहेत.

आचार्य आनंदऋषीजींवर अपार श्रद्धा असल्याने अभय गुगळे आरोग्याची साथ नसताना देखील नित्य नियमाने व्यायाम करून बरे झाले आहेत. व आपला मौल्यवान वेळ हॉस्पिटलच्या प्रकल्पामध्ये देत असल्याने हा प्रकल्प नावारूपाला आला आहे. तसेच सचिन कटारिया यांनी हॉस्पिटलच्या प्रशासकीय समस्या सोडविण्यासाठी वेळोवेळी सहकार्य केले आहे.

उद्योजक संतोष गुगळे यांनी वर्धमान महावीर युनिव्हर्सिटीच्या २३ एकर जागेसाठी मोठे सहकार्य केले आहे. मानक कटारिया यांनी हॉस्पिटलच्या कामासाठी मुंबई पुणे येथे अनेक वेळा चकरा मारल्या आहेत.तसेच अमोल पटवा यांनी इंग्लिश मीडियम स्कूल सुरू करून शैक्षणिक कार्यात चांगले योगदान दिले आहे.

श्याम चोरडिया हे तीस चाळीस वर्षांपासून साधू संतांची सेवा करीत आहेत. तसेच पुणे येथे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून समाजकार्यात हातभार लावत आहेत. समाजातील अनेक दानशूर व्यक्तींच्या हातभारामुळे व पाठिंब्यामुळे आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मानवसेवेचे कार्य पुढे जात आहे. नगर सारख्या शहरात २६० बेडचे अत्याधुनिक रुग्णालय उभे राहिले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये कॅन्सर विभागामार्फत कॅन्सर रुग्णांना अद्यावत सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच कॅन्सर रुग्णांना चांगली उपचार व सेवा मिळावी यासाठी अनुभवी तज्ञ डॉ.अनिकेत शिंदे हे कार्य करीत आहेत.

मोफत कॅन्सर तपासणी शिबिरास प्रतिसाद

सुभाष मुनोत म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटल गरजू रुग्णांसाठी वरदान ठरले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या प्रत्येक रुग्णाची आपुलकीने विचारपूस केली जाते. तसेच येथील सर्व डॉक्टर्स व कर्मचारी निस्वार्थपणे सेवा करीत आहेत.

अभय गुगळे म्हणाले, समाजातील दानशूर व्यक्तीच्या मदतीमुळे व सद्भावनेतून आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिरे घेतली जात आहेत.रुग्ण सेवा हीच खरी ईश्वर सेवा समजून येथे आलेल्या रुग्णांची निस्वार्थपणे सेवा केली जाते.

डॉ.अनिकेत शिंदे म्हणाले, भारतात कॅन्सरचे मोठे प्रमाण आहे. पूर्वी कॅन्सरच्या रुग्णांना उपचारासाठी मुंबई पुणे येथे जावे लागत होते. परंतु आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे कॅन्सर सर्जरी केमोथेरपी रेडिएशन सुविधा एका छत्रा खाली सुरू करण्यात आली आहे. येणाऱ्या काळात आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये कॅन्सर विभाग नावारूपाला येईल व कॅन्सरच्या असंख्य रुग्णांची सेवा घडेल. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. तर आभार मानक कटारिया यांनी मानले. या शिबिरात ७० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

तांबोळी हज टूर्सचे सर्व हज यात्रेकरू सुखरूप परत पोहोचले

येथील तांबोळी टूर्सच्या वतीने हज–२०२४ मध्ये सामील होण्यासाठी मुंबई येथून एअरपोर्ट वरून ११ जून रोजी जेद्दाह, मक्का मुकर्रमासाठी हुए रवाना झाला होता. संपूर्ण सौदीच्या दिवसाच्या प्रवास ज्याममध्ये मक्का मुकर्रमा येथे पोहोचल्या बरोबर उमरा, हज यात्रेचे दिवस, त्यानंतर खानी काबा येथे जवळ राहून प्रार्थना, नमाज पठन, दुवा त्यानंतर ११ ते पायून २० जुलै पर्यंत मदीना मुनवरा येथे मुक्काम तिथे जियारात व नमाज पठन इसादी धार्मिक विधी उरकून २१ जुलै रोजी सर्व हज यात्रेकरूंचा हुए मुंबई येथे सुखरूप घरी परत पोहोचला, अशी माहिती हज्जी सौकतभाई तांबोळी यांनी दिली.

विद्यार्थ्यांनी राबवली निवडणूक प्रक्रिया

नगर – आगामी काळात विधानसभा निवडणुका जवळ आल्या आहेत. मोठी मोठाले मतदान कसे करतात? ईव्हीएम म शीन कशी असते? याही का लावतात? असे अनेक प्रश्न विद्यार्थी शिक्षकांना विचारत असतात. विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया कशी असते याची माहिती व्हावी म्हणून इ. ५ वी चे वर्गशिक्षक गणेश कवडे सर यांच्या संकल्पनेतून आज प्रशालेत संविधान शिक्षण उपक्रमांतर्गत निवडणूक घेण्यात आली.

स्वातंत्र्य सैनिक जानकी कवडे प्रशालेचा उपक्रम

स्वा.सै. जानकीबाई कवडे प्रशालेत निवडणूक प्रक्रिया राबविताना विद्यार्थी. समोर ५ वी चे वर्गशिक्षक गणेश कवडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

वर्गाचा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री पदासाठी ४ विद्यार्थी उमेदवार इच्छुक होते. त्यांना १ तास प्रचार करण्यासाठी वेळ दिला. मतदान अधिकारी कु. आलिया हसन पटेल हिने बोटावर शाई लावली. कु. गौरी महेश डुमणे हिने बॅलेट युनिट सांभाळले. मतदान संपल्यानंतर निकाल दाखवण्यात आला.

उजैर ईरशाद शेख याला सर्वाधिक मते मिळाली आणि मुख्यमंत्री म्हणून त्याची निवड झाली. दुसऱ्या क्रमांकावर कु. सुमैय्या समीर परदेशी हिला मते मिळाली. निवड झालेल्या विद्यार्थी मंत्र्यांचे मुख्याध्यापक नंदकुमार लोंढर सर यांनी अभिनंदन केले. यावेळी पंडित सर, खान सर, जावळे मॅडम यांनीही मतदानाचा हक्क बजावला.

उच्च शिक्षणासाठी श्रृती गांधीची निवड

श्रीरामपूर – येथील श्रृती शिरिष गांधी हीची सिडनी विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी निवड झाली आहे.

श्रृती गांधी ही २७ जुलै रोजी सिडनी येथे जाण्यासाठी प्रस्थान करणार आहे. स्व. हिरालाल मोहनलाल गांधी, चिरंजीव शिरीष गांधी (गांधी सर) व सौ. निर्मला गांधी यांची श्रृती ही तृतीय कन्या आहे. तीचे उच्च शिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

दुबईच्या विद्यार्थ्यांनी श्री आनंद पार्श्व गुरुकुलमध्ये सादर केले मॅजिकल सायन्स इव्हेंटचे प्रात्यक्षिक

नगर – श्री आनंद पार्श्व गुरुकुल येथे दुबई मध्ये शिक्षण घेत असलेले व विज्ञान विषयात पारंगत असलेले विद्यार्थी यांनी मॅजिकल सायन्स इव्हेंटचे प्रात्यक्षिक सादर केले.

दुबईच्या विद्यार्थ्यांनी श्री आनंद पार्श्व गुरुकुल येथे मॅजिकल सायन्स इन्हेन्टची प्रात्यक्षिक करून दाखविली.

२५ जुलै शेजी श्री आनंद पार्श्व गुरुकुल येथे जैनम जैन व जीविका जैन यांचे छोटया विद्यार्थ्यांनी दुबई येथून येऊन आज केडगाव मधील श्री आनंद पार्श्व गुरुकुल मध्ये हजेरी लावत मॅजिकल सायन्स चे खूप छान प्रकारे प्रात्यक्षिक सादर केले. यामध्ये त्यांनी विज्ञानाची वेगवेगळे प्रयोग जे जादू सारखे वाटलात ते करून दाखवले. विद्यार्थ्यांनी ते आवडीने शिकून घेतले व त्यामागील विज्ञान समजावून घेतले. या कार्यक्रमास शाळेतील विज्ञान शिक्षिका नाजनीन कारचे व गुंजन शेळके यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाप्रसंगी शाळेच्या प्राचार्या श्रीमती कादंबरी सूर्यवंशी व ट्रस्टी श्रीमती मेघा बोरा उपस्थित होत्या.

कार्यक्रमाप्रसंगी बोलताना शाळेच्या प्राचार्या श्रीमती कादंबरी सूर्यवंशी यांनी मुलांच्या विज्ञानाची आवड निर्माण व्हावी व त्यांना विज्ञानाची गोडी लागावी यासाठी शाळा असे उपक्रम सतत राबवत असते.

तसेच ट्रस्टी श्रीमती मेघा बोरा यांनी जैनम जैन व जीविका जैन यांचे आभार मानले व त्यांनी प्रदर्शित केलेल्या मॅजिकल सायन्स इव्हेंटचे कौतुक केले.

ग्रामपंचायत कारवाडी, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर जाहीर निविदा

येथील ग्रामपंचायत कारवाडी, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर खालील कामाचे नॉदणीकृत ठेकेदार, पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी–१ निविदा दरपत्रके मागविणेत येत आहे.

कामाचे नाव	योजना	अंदाजपत्रकीय रक्कम	ठेकेदाराचा वर्ग
मौजे कारवाडी येथे गावठाण अंतर्गत तिघपिट बांधकाम करणे	१५ वित्त आयोग–सन २०२४–२५	३,१९,१५५/–	सु.वे.
मौजे कारवाडी येथे गावठाण मागासवर्गीय वस्ती समाजमंदिर दुरुस्ती करणे.	१५ वित्त आयोग–सन २०२४–२५	१,००,०००/–	खुला

अटी व शर्ती :– १) निविदा फॉर्म माहिती पत्रक दि. २६/०७/२०२४ ते २/०८/२०२४ या कालावधीत प्रायपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी–१ निविदा दि. ३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित येतील. ३) निविदा स्विकारण्या अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे. **मिविदेशीबत** – १) जि. प.नॉदणी २) जी.एस.टी ३) पॅन कार्ड ४) अनुभवाचा दाखला

ग्रामसेवक /सरपंच
कारवाडी, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर

श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी नाम सप्ताह सोहळ्याला सुरुवात

नगर – सालाबादप्रमाणे याही वर्षी २६ जुलै रोजी श्री विठ्ठल मंदिर, डावरे गल्ली येथे श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी दिना निमित्त नाम सप्ताह सोहळ्याला उत्साहात आणि भक्तीमावात सुरुवात झाली. सकाळी ९ वा. इंटरियर डिझायनर अमोल खोले आणि परिवाराच्या वतीने श्री विठ्ठल रखुमाई आणि संत नामदेव महाराजांच्या मूर्तिचे विधिवत अभिषेक करून पूजा आर्च करण्यात आली. त्यानंतर नाम साप्ताहाचा शुभारंभ विना पूजन करून तसेच संजय काळे महाराज व साबळे महाराज यांच्या भजन कीर्तनाने झाली. या प्रसंगी समाज बांधव आणि भगिनी उपस्थित होते.

श्री विठ्ठल मंदिर, डावरे गल्ली येथे श्री संत शिरोमणी नामदेव महाराज संजीवनी समाधी दिना निमित्त नाम सप्ताह सोहळ्याला सुरुवात झाली.

यावेळी समाजाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कविटकर आणि ट्रस्टींकडून २ ऑगस्टपर्यंत होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमाचा तसेच आयोजित केलेल्या भजन संध्येचा सर्व नागरिकांनी सह कुटुंब सह परिवार उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

यावेळी समाजाचे उपाध्यक्ष महेश जाधव, सचिव अभिजीत पाडळकर, खजिनदार सुजित चांडवले, सदस्य मुकुंद बगडे, संपर्क प्रमुख प्रभ ु ल जवळकर, ज्ञानेश्वर पवार, अशोक जाधव, अजय कविटकर, महेश गिते, अरुण जवळकर, रमेश वाळके तसेच समाज बांधव आणि नामदेव सांस्कृतिक महिला मंडळाच्या महिला उपस्थित होते.

दैनंदिन कार्यक्रम पुढीलप्रमाणे असतील – २६ जुलै रोजी सायं.७ ते ८ सोहम लासूरकर भजनी मंडहाचे भजन, २७ रोजी सकाळी ८ ते ९ श्री. व सौ. विकास तीडके यांच्या हस्ते अभिषेक, दुपारी ४ ते ६ सिद्धकला महिला मंडळाचे भजन, सायं.७ ते ८ ह.भ.प. निळकंठ देशमुख महाराजांचे प्रवचन. २८ रोजी सकाळी ८ ते ९ श्री. व सौ. प्रसाद मांढरे यांच्या हस्ते अभिषेक, दुपारी ४ ते ६ हनुमान चालिसा पठण व भजन संध्या. सायं.७ ते ८ सत्यसाई भजनी मंडळाचे भजन. २९ रोजी सकाळी ८ ते ९ सौ. व श्री. गणेश गिते यांच्या हस्ते अभिषेक. दुपारी ४ ते ६ नामदेव भजनी मंडळ (शिंदे मळा) चे भजन सायं.७ ते ८ ह.भ.प. कस्तुरे महेश महाराज यांचे प्रवचन, ३० रोजी सकाळी ८ ते ९ सौ. व श्री. संजय होनराव यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक ४ ते ६ रेणुका भजनी मंडळाचे भजन सायं.७ ते ८ ह.भ.प. श्री. गोलांडे महाराज यांचे प्रवचन, ३१ रोजी सकाळी ८ ते ९ सौ. व श्री. गणेश होनराव यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक, सायं. ७ ते ८ ह.भ.प. मिनाबाई काशिद यांचे प्रवचन.

१ ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते ९ सौ. व श्री. महेश जाधव यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक, दुपारी ४ ते ६ सुरभी भजनी मंडळाचे भजन, सायं.७ ते ८ ह.भ.प. निर्मिद चवंडके यांचे प्रवचन, २ ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते ९ सौ. व श्री. अभिजित पाडळकर यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक, सकाळी ९ ते १२ या वेळेत श्री नामदेव महाराजांची मिरवणूक, दुपारी १२.३० वा. महाआरती, दुपारी ९.३० ते ४ महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम.

१ ऑगस्ट रोजी सायं.७ वा. समाजातील गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात येणार आहे.

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक १) पोपटलाल कस्तुरचंद कटारिया २) चंद्रकला पोपटलाल कटारिया दोघे रा.वियर कॉलनी, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर यांच्या खरेदी मालकीची सहीवट असून त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान सदर मिळकतीच्या विक्रीबाबत बोलणी होऊन मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आपण असिलाकडून विसरा दाखल रक्कम स्विकारून साठेखत करून सदर मिळकत आमचे अशिलास खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतीचा खरेदीव्यवहार व्यवहार लवकरच होणार आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही बोजा नसून सदर मिळकत निर्बोज, निजोखमी आहे असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणतेही चालु वाद, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, जप्ती, दावा, लिण, गहाण, दान, पोटगी हक्क, सोसायटी एाईस्ड इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी कळवावे. जर मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे असिल सदर खरेदीव्यवहार व्यवहार पूर्ण करतील मग त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारची हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिली आहे असे समजण्यात येईल.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन : दि ।। अहमदनगर सब डि।। ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर हद्दीतील तोफखाना मु. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे सावेडी येथील सर्व्हे नं.३१/५अचे भाग्यीत प्लॉट नं.३ यातु एकुण क्षेत्रफळ २८०.०० मी. चौ. (७/१२ उतारा–३१मागे क्षेत्र २.८०.०० आर. चौ. मी.) ही संपूर्ण खुली प्लॉट मिळकत..

त्यांची चतुःसिमा –
पुर्वेस – प्लॉट नं. ४, दक्षिणेस – सर्व्हे नंबर पैकी,
पश्चिमेस – प्लॉट नं. २, उत्तरेस – रस्ता,

वेगेप्रमाणे चतुःसिमापुर्वक संपूर्ण खुला प्लॉट मिळकत व तदंगभुत वस्तु, वहिवाट, वाणपुळीचे हक्कासह काहीही एक राखून न ठेविता असे.
तारीख २६/०७/२०२४
शांतीलाल अपार्टमेंट, ॲडव्होकेट
चेंबर्स नं.३, जुने निव्हला न्यायालय,
कोर्ट झोपी, अहमदनगर मो.९८२२२४८१११

बाबासाहेब नानासाहेब रणसिंग
विनोद बाबासाहेब रणसिंग
ॲडव्होकेटस्

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक १)पोपटलाल कस्तुरचंद कटारिया २)चंद्रकला पोपटलाल कटारिया दोघे रा.वियर कॉलनी, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर यांच्या खरेदी मालकीची सहीवट असून त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान सदर मिळकतीच्या विक्रीबाबत बोलणी होऊन मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आपण असिलाकडुन विसरा दाखल रक्कम स्विकारून साठेखत करून सदर मिळकत आमचे अशिलास खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतीचा खरेदीव्यवहार व्यवहार लवकरच होणार आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही बोजा नसुन सदर मिळकत निर्बोज, निजोखमी आहे असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणुन या जाहीर नोटसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणतेही चालु वाद, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, जप्ती, दावा, लिण, गहाण, दान, पोटगी हक्क, सोसायटी एाईस्ड इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी कळवावे. जर मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर खरेदीव्यवहार व्यवहार पूर्ण करतील मग त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारची हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिली आहे असे समजण्यात येईल.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन : दि ।। अहमदनगर सब डि।। ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर हद्दीतील तोफखाना मु. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे सावेडी येथील सर्व्हे नं.३१/५अचे भाग्यीत प्लॉट नं.३ यातु एकुण क्षेत्रफळ २८०.०० मी. चौ. (७/१२ उतारा–३१मागे क्षेत्र २.८०.०० आर. चौ. मी.) ही संपूर्ण खुली प्लॉट मिळकत..

त्यांची चतुःसिमा –
पुर्वेस – प्लॉट नं. ४, दक्षिणेस – सर्व्हे नंबर पैकी,
पश्चिमेस – प्लॉट नं. २, उत्तरेस – रस्ता,

वेगेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वामणुकीच्या व वहिवाटीच्या हक्कासहीत तदंगभुत वस्तुसहीत काहीही एक राखून न ठेविता.
तारीख : २६/०७/२०२४

ॲड. श्रीकांत गवळी
फ्लॅट नं. एफ–१, पहिला मजला, संस्कृत अपार्टमेंट,
हिरवे गल्ली, नालेगाव, अहमदनगर
मो. ९३२५६३६१७७ / ९२७२५०४०७७

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत मौजे सावेडी, ता. जि. अहमदनगर येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं.३१/५अचे भाग्यीत आमचे अशिल निसराज गेनुजी आव्हाड यांचेकडे विण्ध्य कन्नाने मालकी अधून सदर मिळकतीचे तत्कालिन मालक नवल भईद बेलगी यांनाच व नवल दयाराम हुइगांव आदेव यांनी दि.०२/०४/१९९६ रोजी रजा नं.७४/– चे गुप्तांकाच्या खरेदी व्यवहार साठेखताचा इसर परिशिष्टमीचे नमुद मिळकतीमधत लिहून दिलेल होता व आहे. तेव्हापासुन सदर परिशिष्टातील नमुद मिळकतीमधये आमचे अशिल यांचा हक्क व हितसंबंध निर्माण झालेला होता व आहे. परंतु सदर तत्कालिन विद्यमान मालक नवल झालयानंतर सदर परिशिष्टातील नमुद मिळकतीबाबत विनकळवाये Confirmation Deed सन २००८ रोजी नॉदविण्याला आलेले अधुन तदनंतर विनकळवाये खरेदीदार सन २०११ मध्ये नॉदविण्याला आलेले आहे. असे आमचे अशिल यांना मुक्तपेक्षे समजण्याने आमचे अशिलांनी त्या संदर्भातील नकळा संबंधित युध्दन निर्णयक कायदेसायुक्त प्राप्त करून सदर वरील नमुद व्यवहारांच्या अनुषंगाने तद्दीक कागदपत्र आलेल्या मिळकतीचे तत्कालिन व विद्यमान मालकांना / पक्षकारांना आमचे अशिल यांनी वकीलांमार्फत कायदेशीर नोटीसा देवीन पाठविलेल्या आहेत. असा परिशिष्टातील सदर परिशिष्टातील नमुद मिळकतीच्या अनुषंगाने कोणतेही, कोणत्याही प्रकारे सदर परिशिष्टातील नमुद मिळकतीसंदर्भात कोणत्याही प्रकारचा किंवा, विभक्त अथवा हस्तांतरण व्यवहार करु नये व केल्यास सदरील व्यवहार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

दि।। अहमदनगर सब डि।। तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

अ)	सर्व्हे नं. ८२/४१/२अ	जुना स.नं. ४५/४१/२अ	क्षेत्रफळ हे. आर ०.३५
			आकार रु. पैसे ०.३५
ब)	सर्व्हे नं. ८२/४१/२अ	जुना स.नं. ४५/४१/२अ	क्षेत्रफळ हे. आर ०.३५
			आकार रु. पैसे ०.३५

त्यांची चतुःसिमा –
पुर्वेस : स.नं.८८ (जुना स.नं. ७६),
दक्षिणेस : स.नं. ८२ (जुना स.नं.७५) पैकी
पश्चिमेस : स.नं.४२३ पैकी,
उत्तरेस : स.नं.८२ (जुना स.नं.७५) पैकी

वेगेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वामणुकीच्या व वहिवाटीच्या हक्कासहीत तदंगभुत वस्तुसहीत काहीही एक राखून न ठेविता.
तारीख : २६/०७/२०२४

ॲड. श्रीकांत गवळी
फ्लॅट नं. एफ–१, पहिला मजला, संस्कृत अपार्टमेंट,
हिरवे गल्ली, नालेगाव, अहमदनगर
मो. ९३२५६३६१७७ / ९२७२५०४०७७

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत मुळ मालक कै. अरुंधतीकेशव जैतुल अबेदीन अन्सारी यांच्या स्वसंपादीत खरेदी मालकीची होती. सदी ते दि. ९१/०८/२०१८ रोजी मयत झाल्याने त्यांचे कायदेशीर वारस म्हणून संगमकीय ७/१२ उतान्यावरील विद्यमान मालक १) जैतुल अबेदीन ब्रम्हुत मणी अन्सारी, २) गोहांगर ग्रमी जैतुल अबेदीन अन्सारी, ३) मोहंमद मोहेद जैतुल अबेदीन अन्सारी या ४) मेहेर माहिरा अरफराज खान सर्व रा. दुग्धार पालन को. ऑप. हौसिंग सोसायटी, बी–२/३०३, कोंढवा बु., पुणे यांचे मालकीची असून विद्यमान मालक यांच्या नावावरी नोंद ७/१२ उतान्यावर फेरफार नं. ५८६३३ अन्वये मिळकतीच्या ७/१२ रेकॉर्डला वारस म्हणून झालेली असून विद्यमान मालक यांनी सदर मिळकतीचे साठेखत आमचे अशिल यांचे सेक्स झफीक अब्दुल रहीम (अहमदनगर) यांच्याशी केलेला असून विसार म्हणून रक्कम देवीन पेतलेली आहे व लवकरच खरेदीव्हार होणार आहे. तरीच सदर मिळकत ही निर्बोज निजोखमी व बोजाहीत, असल्याचा विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिण, गहाण, दान, पोटगी हक्क, सोसायटी एाईस्ड व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे आपर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यात येईल.

परिशिष्ट

१) मिळकतीचे वर्णन –
जिल्हा पुणे ही अहमदनगर पो. दु. ता. नगर पैकी अहमदनगर येथील महानगरपालिका हद्दीतील मौजे आष्टी येथील बिगरशेती प्लॉट व त्यापरील बांधकामासह मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

सर्व्हे नंबर	प्लॉट नंबर	चौरस मीटर
८४/अ	२३	२७८.८१

(जुना सर्व्हे नं. ७९अ)
हा संपूर्ण प्लॉट व त्यापरील संपूर्ण बांधकामासह मिळकतीबाबत.

त्यांची चतुःसिमा :
पुर्वेस – प्लॉट नं. २४, दक्षिणेस – ३० फुटी रस्ता,
पश्चिमेस – प्लॉट नं. २२, उत्तरेस – प्लॉट नं. २० व २१,

वेगेप्रमाणे चतुःसिमापूर्वक काही एक राखून न ठेविता मिळकत...
दि.२६/०७/२०२४
अहमदनगर.

ॲड. सय्यद अफफाक अहमद
बी–७, उजाला अपार्टमेंट, सी. एफ. हाईट,
सुलिमान बेकिंगचेज, गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर
मो. ९८२२०२४०३८ / ९०२८२२०६१६

एस.नं.ए.एन.आर./आर. एस. आर/सी. आर. ३३४ – ९२–९३ / १९९२

डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्था, मर्या., अहमदनगर

जा. नं. – वार्षिक सभा दिनांक : १५–०७– २०२४

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त सभासदांकरीता)

डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची ३२ वी **वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक–०३/०८/२०२४ रोजी, दुपारी ३.०० वा. श्रीरामभवन मंगल कार्यालय, सुप्रसाधर हॉटेलमागे, कोठी रोड, अहमदनगर येथे मा. चेअरमन फा. विन्सास पडेस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. ही नम्र विनंती.**

सभेपुढील विषय

१) अध्यक्षांची निवड करणे.
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचणे व कायम करणे.
३) सन २०२३–२४ या कालावधीतील आर्थिक पत्रके, तेरीज, ताळेबंद व नफा–तोटा पत्रकास मान्यता देणे.
४) सन २०२३–२४ या कालावधीतील वैधानिक लेखा परिक्षण अहवाल व अंतर्गत तेखापरीक्षण अहवाल यांस मान्यता देणे. व सन २०२३–२४ या दोष दुरुस्ती अहवाल सादर करणे.
५) नफा वाटणीस मंजुरी देणे व सभासदांना लाभांश जाहीर करणे. (पान क्र.१८ वर पहावे)
६) संचालक मंडळ व नातेवाईक कलम ७५(२) यकबाकी जाहीर करणे.
७) थकबाकी वसुलीसाठी निर्णय घेणे.
८) बाहेरील कर्ज भागरयाचे अधिकार संचालक मंडळ यांना देणे.
९) सन २०२४–२५ या कालावधीचे अंतर्गत व शासकीय लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे.
१०) सन २०२४–२५ या कालावधीसाठी खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
११) संचालक मंडळाने घुसविलेल्या उपविधी दुरुस्तीस मंजूरी देणे.
१२) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन
कार्यकारी अधिकारी
डॉन बॉस्को नागरी सह. पतसंस्था मर्या., अहमदनगर

टीप :
१) कोरम अभावी वरचा सहकुल झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर विषय पत्रिकेतील विषयांवर निर्णय घेण्यासाठी सभा बोलावी जाईल.
२) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सात्रेच्यूर्वी तीन दिवस आधी लेखी आलेल्या प्रश्नांचाच चर्चा करण्यात येईल. याच असे विषय उपविधी सुधारणा व कायदेसाठ पद करणे या व्यतिरिक्त असलेले, तसेच एखादा विषयाचा सहा महिन्यामा आत पुनर्विचार करण्यासंबंधीचा विषय सभासा.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक माहिती

विज्ञानवार्ता

तणावमुक्त व्हायचंय?

आजकाल जवळजवळ प्रत्येक व्यक्ती तणावाखाली आहे. अर्थात् प्रत्येकाचे कारण वेगवेगळे आहे. जग ज्या वेगाने प्रगती करत आहे, त्यासोबत तणावही आपल्या जीवनाच्या एक भाग बनत चालला आहे. त्यामुळे अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात. तणाव पूर्णपणे काढून टाकणे सोपे नाही. मात्र, काही प्रयत्न करून यापासून नक्कीच सुटका होऊ शकते. चला जाणून घेऊया तणावाचे कारण आणि ते टाळण्याचे प्रभावी उपाय.

वास्तविक, आपल्या शरीरात तणावामुळे होणाऱ्या प्रक्रियांवर नियंत्रण ठेवण्याचे काम कॉर्टिसॉल नावाच्या संप्रेरकाद्वारे केले जाते. कॉर्टिसोलचे प्रमाण वाढले की ताणही वाढतो. काही चांगल्या सवयींनी कोर्टिसोल आणि तणाव दोन्ही नियंत्रित करता येतात. ताण आणि आहार यांचा खोलवर संबंध आहे. पोषक तत्त्वांनी युक्त अन्न खाल्ल्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहते. यामुळे झोप चांगली लागते आणि तणाव कमी होतो. मिंट किंवा लेमन ग्रास चहा कोर्टिसोलची पातळी कमी करून तणाव कमी करू शकतो. तणाव टाळण्यासाठी तुम्ही डार्क चॉकलेटही खाऊ शकता. यामध्ये ऑर्टोऑक्सिडॉइस आढळतात, जे तणाव कमी करण्याचे काम करतात.



याशिवाय एवोकॅडो, बदाम, अक्रोड पिस्ता, चिया सीड्स आणि फ्लेक्ससीड्स यांसारख्या गोष्टींच्या 'ओमेगा-३ फॅटी ॲसिड' आणि 'मॅग्नेशियम' मुबलक प्रमाणात आढळतात, ज्यामुळे तणाव कमी होतो. लिंबूर्गाय फळे आणि पालेभाज्या देखील तणावापासून आराम देतात. स्मार्टफोन किंवा लॅपटॉपचा वापर सध्या खूप वाढला आहे. अशा परिस्थितीत झोपण्याच्या एक तास आधी स्क्रीनपासून अंतर राखले पाहिजे. वास्तविक, या गॅजेट्समधून निघणारा निळा प्रकाश झोपेवर परिणाम करतो. फोनचा सतत वापर केल्याने मेंदू सक्रिय राहतो. त्यामुळे शरीरातील कोर्टिसोलची पातळी वाढते. अशा परिस्थितीत, तणाव एक ट्रिगर असू शकतो.

लवकरच होणार तारकीय स्फोट

अवकाशात अनेक विस्मयनाम घडत असतात. बऱ्याचदा या सर्व घटना सर्वसामान्यांना साध्या डोळ्यांनी पाहताही येत नाहीत, मात्र, लवकरच अवकाशप्रेमींना ८० वर्षांनंतर होणारा तारकीय स्फोट पाहण्याची संधी मिळू शकेल, असा संशोधकांचा होरा आहे. एरवी, दर ८० वर्षांनंतर होणारा हा तारकीय स्फोट इतका मोठा व शक्तिशाली असतो की, याचे दृश्य लाखो किलोमीटर अंतरावरून साध्या डोळ्यांनीही पाहता येऊ शकते. संशोधकांच्या मते, हा स्फोट येत्या काही दिवसांत केव्हाही घडू शकतो.

हा स्फोट म्हणजे तारकीय स्फोट अर्थात स्टेलर एक्स्प्लोजन असते. हा स्फोट इतका मोठा आणि शक्तिशाली असतो की, त्यापुढे विद्यातले अनेक चमत्कारही छोटे ठरतील. ही घटना अनुभवण्यासाठी शास्त्रज्ञ खूप उत्सुक आहेत; मात्र या घटनेचा पृथ्वीवर कही परिणाम होईल की नाही त्याबाबत सध्या कही सांगता येणार नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. एका रिपोर्टनुसार, अवकाशात जेव्हा बेत बटू तारा फुटतो तेव्हा अशी रोशेबेरणी आतषबाजी झालेली दिसून येते. या घटनेनंतर त्या ताऱ्याची चमक दहा हजार पटींनी वाढते. ही खूप शक्तिशाली स्फोट असतो. त्यामुळे तो साध्या डोळ्यांनीदेखील पाहता येऊ शकतो.

नासाचे शास्त्रज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ ही घटना पाहण्यासाठी खूप वाट पाहत आहेत. याला नोव्हा इव्हेंट असेही म्हटले जाते. यात एक बेत बटू तारा आजूबाजूच्या मोठ्या आणि ज्वलंत लाल राक्षसी ताऱ्यांकडून सौर साम्राज्ञी ओढून घेतो. त्यातून उत्पन्न होणारी उष्णता आणि दाब खूप वाढतो आणि त्याचा परिणाम म्हणून थर्मोन्यूक्लिअर स्फोट होतो. यामुळे आकाशातला तो बेत बटू तारा अधिक तेजस्वी दिसू लागतो. मात्र, तो तारा या स्फोटामुळे पूर्णपणे नामशेष होत नाही. जेव्हा तो स्फोट संपतो, तेव्हा तो तारा त्याच्या मूळ तेजाच्या रूपात परत येतो. हा महाकाय स्फोट म्हणजेच नोव्हा. ही घटना जेव्हा घडत असते, तेव्हा एक आठवड्याचेसा जास्त कालावधीसाठी आपण साध्या डोळ्यांनी तो पाहू शकतो. ही एक खगोलीय घटना असते. ती घडते तेव्हा आकाशात एखाद्या नवा तारा प्रकट होत असल्याप्रमाणे भासते. नासाच्या माहितीनुसार, हा स्फोट अतापासून सप्टेंबर महिन्यापर्यंत दिवसा किंवा रात्री कधीही घडू शकतो.

गोष्ट साडे बारा लाखांच्या पिझ्झाची



स्पा बऱ्याच क्षेत्रात पराकोटीची स्पर्धा दिसून येते. व्यवसायात यशस्वी होण्यासाठी हरतऱ्हेने प्रयत्न करावे लागतात. मॅंथ्यू परखस्त नावाच्या व्यक्तीने ग्राहक मिळवण्यासाठी वापरलेली युक्ती तर त्याला जगभरात प्रसिद्ध करून गेली. मॅंथ्यूचा व्यवसाय भले छोटा असला तरी त्याची कल्पना आश्चर्यकारक होती. मॅंथ्यूने ऑर्डर मिळवण्यासाठी ग्राहकांना चक्क १२.५ लाख रुपयांचा पिझ्झा सर्व्ह केला. सुरुवातीला त्याच्या कंपनीतील सहकारी या विरोधात होते. पण, जेव्हा त्याची ही कल्पना यशस्वी ठरत गेली त्यावेळी त्यांचेही मत बदलले. मॅंथ्यू परखस्त हा न्यूयॉर्कमध्ल्या ॲटिकेटल या टेक स्टार्टअपचा सीईओ आणि सहसंस्थापक आहे. त्याने आपल्या कंपनीसाठ्ठन ऑर्डर मिळवण्यासाठी कलाकेटला १५ हजार डॉलर्स (१२.५ लाख रुपये) किमतीचा पिझ्झा खाऊ घातला. त्याने हा वायफळ खर्च केला, असे सुरुवातीला कंपनीचे अधिकारी आणि त्याच्या मित्रांना वाटले आणि त्यात गैरही नव्हते. मात्र, दोन महिन्यांनंतर मॅंथ्यूच्या कंपनीचा नफा वाढून १० हजार डॉलर्सवर म्हणजे सुमारे ८.३ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला. यावरोभरच आणखी एक महत्त्वाचे म्हणजे पिझ्झा मिळवणाऱ्या ७५ कंपन्या त्याच्या ग्राहक बनल्या.

नोटांची बंडले फेकणारा धनाढ्य

आपल्याकडे भरपूर पैसे असावेत, असे जवळपास प्रत्येकाला वाटते आणि त्यात काही गैर देखील नाही. जास्तीचा पैसा हा चांगलाच असतो. आपले आयुष्य अधिक सुखकर करण्यासाठी हा पैसा अर्थातच उपयुक्त ठरतो. पण, इंटरनेटवर सध्या असा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यात एक धनाढ्य व्यक्ती आपल्या घराबाहेर चक्क पैसे उधळत आहे, बंडलच्या बंडल वाटत आहे. शिवाय, ते गोळा करून एका भल्यामोठ्या वाहनात भरतदेखील आहे. हा व्हिडीओ नेमका कुठला आहे, हे जरी यात स्पष्ट होत नसले तरी इन्स्टाग्राम पेजवरून याचा व्हिडीओ पोस्ट केला गेला आहे.

या व्हिडीओतील व्यक्ती घराबाहेर नोटांचे बंडलच्या बंडल घेऊन बसलेली आहे. शिवाय, बाजूनेदेखील त्यापेक्षाही जास्त नोटा विखुरलेल्या दिसून येत आहेत. ही व्यक्ती चक्क वस्त्यासारखा पैसा फेकत असल्याने अर्थातच नेटिझन्सना याबद्दल असलेली उत्सुकता दिसून येत आहे. फेकर बालवानोबिच असे या व्यक्तीचे नाव असून तो आपल्या आलिशान घरासमोर ढीग घेऊन बसला असल्याचे यात अधोरेखित होते. या व्यक्तीकडे इतक्य पैसा आहे की, पैशांच्या नोटा तो कुठेही, कसाही फेकतो आहे, असेही दिसून येते. तो घराबाहेर कधी नोटा बेगेतून काढतो, कधी नोटा बॅगेत भरतो, कधी नोटा कचऱ्यासारख्या फेकूनही देतो. यामुळे आश्चर्य वाटणे साहजिकच. फेकरने आपल्याकडे असलेल्या या पैशांपैकी काही पैशांचे वाटप केले तर बऱ्याच लोकांना गाडीतून तो नोटांचे बंडल देतानाचेही व्हिडीओ आहेत. फेकरचे हे व्हिडीओ पाहून लोक थक्क झाले आहेत, तर काहींनी संताप व्यक्त केला आहे. पैसे असे उडवताना पाहून बऱ्याच लोकांनी त्याला पैशांची किंमत करायला शिकण्याचा सल्ला दिला आहे. दरम्यान, या पैशांच्या नोटा खऱ्या आहेत का, याचा मात्र काहीच उलगडा होऊ शकलेला नाही!

चक्क गुलाबी डॉल्फिन !

समुद्रसृष्टीचे मनुष्याला अनंत कालापासून आकर्षण राहत आले आहे. समुद्रात आताही यापूर्वी कधीच पाहण्यात न आलेले जीव पाहण्यात येतात आणि यामुळे आश्चर्याचा आणखी एक धक्का बसतो. समुद्रातील डॉल्फिन सफारी तर अनेक ठिकाणी प्रसिद्ध आहे. फक्त डॉल्फिन पाहण्यासाठीच अनेकजण समुद्रातची सफर करतात. प्रत्यक्षात आपण आजवर पाहत आलो आहोत ते सफेद डॉल्फिन असतात. मात्र, सध्या सोशल मीडियावर गुलाबी डॉल्फिनची काही छायाचित्रे व्हायरल होत असून, यामुळे गुलाबी डॉल्फिनची चर्चा रंगत आहे. व्हायरल झालेल्या या पोस्टमध्ये दुर्मीळ गुलाबी डॉल्फिन समुद्रात पोहताना दिसत आहे.

डॉल्फिन हा मानवानंतर जगातील सर्वात बुद्धिमान प्राणी मानला जातो. डॉल्फिन जितका हुशार आहे तितकाच दुर्मीळदेखील आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, हा गुलाबी डॉल्फिन अमेरिकेच्या नॉर्थ कॅरोलिना किनाऱ्याजवळ दिसला होता. गुलाबी डॉल्फिन हा क्वचितच दिसणाऱ्या प्राण्यांपैकी एक आहे. अशा परिस्थितीत त्याचे दुर्मीळ रूप कॅमेऱ्यात कैद होणे ही प्राणीप्रेमींसाठी सुखद अनुभूती असते. याआधीही कॅलिफोर्नियामध्ये व्हेल मासे पाहण्यासाठी गेलेल्या एका गटाला एक अद्भुत पांढरा डॉल्फिन दिसला होता. कॅप्पर नावाचा हा पांढरा डॉल्फिन व्हेल पाहण्यासाठी गेलेल्या लोकांच्या बोटीबरोबर पोहत होता. आतापर्यंत दुर्मीळ डॉल्फिनचे हे छायाचित्र असंख्य नेटिझन्सनी पाहिले आणून, त्यावर अनेक प्रतिक्रिया दिल्या आहेत. गुलाबी डॉल्फिन पाहणे खरोखरच आश्चर्यकारक असल्याचे क्या युजरने म्हटले, तर छायाचित्रात गडबड केली गेल्याचा टफक्त एकाने टेवला आहे.

आजोबा 'सावरले', नातवाचे नाव आठवले!

स्मृतिभ्रंशाचा आजार जडला तर सारे विश्वच बदलून जाते. मात्र, नंतर एखादी व्यक्ती यातून सावरली आणि पूर्वीप्रमाणे सारे काही त्या व्यक्तीला आठवू लागले तर त्याचा आनंद वेगळाच असतो. सोशल मीडियावर असाच एक किस्सा व्हायरल होत असून, यानुसार स्मृतिभ्रंश झालेल्या एका आजोबांना चक्क ५ वर्षांनंतर त्यातून सावरता आले आणि त्यांना या प्रदीर्घ कालावधीनंतर अचानक आपल्या नातीचे नाव आठवल्यानंतर त्या कुटुंबात जणू आनंदाची लहर पसरली.



पाच वर्षांनी अचानक आजोबांना नातीचे नाव बरोबर आठवले आणि ते ऐकून नातीला इतका आनंद झाला की, ती त्यांना मिठी मारून ढसाढसा रडू लागली. भावूक करणाऱ्या या क्षणाचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

स्मृतिभ्रंश हा आजार खूप धोकादायक आजार मानला जातो. स्मृतिभ्रंशामुळे संबंधित व्यक्ती अनेकदा स्वतः संबंधित गोष्टीही विसरते. तसेच ती व्यक्ती त्याच्या प्रियजनांना, त्याच्या मुलांना आणि अगदी कुटुंबातील इतर सदस्यांनाही विसरते. डिमेंशिया या स्मृतिभ्रंशाच्या स्थितीमुळे त्या व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्यांनाही खूप अडचणी येतात. वृद्ध आजोबांना स्मृतिभ्रंशाची समस्या होती. पाच वर्षांपासून ते सर्व काही विसरले होते. कोणाचे नावही त्यांना नीट आठवत नव्हते. मात्र, अचानक एक दिवस त्यांना नातीची आठवण झाली. त्यांनी नातीचे बरोबर नाव उच्चारले. त्यानंतर तिला मिठी मारत तिच्या कानात ते तिचे नाव कुजबुजले. व्हिडीओमध्ये दिसत असलेल्या मुलीचे नाव एंब्ली असे आहे.

गरीबीतील अग्रेसर देश

भारतातील मेट्रो शहरांपासून छोट्या शहरांपर्यंत तर आलिशान वस्तीबरोबरच अगदी छोट्या-छोट्या गल्यांपर्यंत श्रीमंत-गरीब- मध्यमवर्गीय, अशा सर्व स्तरांवरील लोक राहतात. ज्यांच्याकडे थोडाफार पैसा आहे, इच्छा आहे, असे लोक गरजूंना आपल्या ऐपतीप्रमाणे थोडीफार मदत करतात. आसपासमुळे अशा गरिबांचे जगणे थोडे तरी सुसह्य व्हावे, ही भावना असते. पण, याच पृथ्वीतलावर एक देश असाही आहे, जेथे सर्वच लोक गरीब आहेत आणि यामुळे त्यांना या हलाखीच्या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी मदतीचा हात मिळणेदेखील कठीण झाले आहे.



येथील नागरिकांकडे ना नोकरी आहे, ना खाण्यासाठी अन्न. पूर्व आफ्रिकेतील बुरुंडी असे या देशाचे नाव आहे. १९९६ मध्ये ह देश स्वतंत्र झाला. मात्र, यानंतर जातीय संघर्ष सुरू झाला आणि पाहता पाहता तेथील अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली. गरिबीची वेदना समजून घेण्यासाठी बुरुंडीतील परिस्थिती पाहावी लागेल, असा संदेश आता दूरवर याचमुळे पोहोचला आहे. जगातील गरीब देशांमध्ये बुरुंडीचा क्रमांक पहिला लागतो. या देशाची लोकसंख्या सुमारे १२ दशलक्ष म्हणजे १ कोटी २० आहे. देशातील बहुतांश लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकीकडे जग चंद्र आणि मंगळावर जीवसृष्टीचा शोध घेत आहे, त्याचवेळी पृथ्वीवरील या देशात लोकांना जीवन जगण्यासाठी मूलभूत कळात बुरुंडीमधील मोठ्या वांशिक संघर्षांन लाखो लोकांचा बळी घेतला आणि अर्थव्यवस्था उद्धस्त केली.

हळूहळू हा देश आर्थिकदृष्ट्या मागास होत गेला आणि जगातील सर्वात गरीब देशांच्या यादीत पहिल्या क्रमांकावर आला. बुरुंडीशिवाय मादागास्कर, सोमालिया आणि मध्य आफ्रिकन रिपब्लिक असे अनेक देश गरिबीशी झुंज देत आहेत. एका यूट्यूब चॅनलनुसार, या देशातील लोकांचे वार्षिक उत्पन्न १८० डॉलर्स म्हणजे वर्षाला १४ हजार रुपये आहे. येथे दर ३ लोकांपैकी एक बेरोजगार आहे आणि दिवसभर कष्ट करूनही लोकांना दररोज ५० रुपये कमावता येत नाहीत. यून आणि इतर संस्था जगभरातील अनेक गरीब देशांसाठी अनेक प्रकारच्या मोहिमा चालवतात. असे असूनही बुरुंडीसह जगातील अनेक देशांतील परिस्थिती सुधारलेली नाही, ही वस्तुस्थिती डोळ्यात अंजन घालणारी आहे.

एक बिस्किट... रुपये पंधरा लाख!

बिस्किटे अगदी पाच रुपयांपासूनही मिळतात आणि त्यात ८-१० बिस्किटे सहज असतात. काही बिस्किटे महागडी देखील असतात. पण, जगभरातील एक बिस्किट इतके महागडे आहे की, त्या किमतीत अगदी आलिशान, नवी कोरी बसरेखील सहज विकत घेता येऊ शकेल. आता जगातील हे सर्वात महागडे म्हणजे स्पिलर्स ॲंड बेकर्सचे पायलट क्रंचर बिस्किट. हे बिस्किट जगातील सर्वात मौल्यवान बिस्किट म्हणून ओळखले जाते आणि त्याचे खास कारण देखील आहे.

बीबीसीच्या एका अहवालानुसार, या बिस्किटाचा लिलाव करण्यात आला, त्यावेळी त्याची किंमत १५ हजार पाऊंड म्हणजेच १५ लाख रुपये आहे. ब्रीसच्या कलेक्टरने हे बिस्किट त्यावेळी विकत घेतले होते. आता हे बिस्किट इतके महागडे का, असा प्रश्न निर्माण होईल. याचे कारण असे की, हे एकमेव बिस्किट टायटॅनिकवरील होते. टायटॅनिकच्या एका लाईफ बोटमध्ये ठेवलेल्या सर्व्हायव्हल किटमध्ये ते सुरक्षित साघडले आणि त्यानंतर त्याचा लिलाव केला गेला. टायटॅनिकमधून बचावलेल्या व्यक्तीची सुटका करण्यासाठी पाठवण्यात आलेल्या आरएमएस कार्पाथिया जहाजातील जेम्स आणि मेबेल फेनकिंग या कपलने हे बिस्कीट उचलले. ते त्यांनी कोडॅक फिल्मच्या पाकिटात आठवण म्हणून जपून ठेवले.

या बिस्कीटाचा लिलाव करायरे लिलावदार ॲंड्रयू एल्ड्रिज यांनी याआधीही महागडे बिस्कीट विकले होते. एकमात्र भीषण अपघातातून एक बिस्कीट सुरक्षित राहिले. त्यामुळे त्याला महगडी बोली लागणार, हे साहजिकच होते.

खोबरे कोणते खावे?

नारळ पाण्याबरोबरच त्याचे खोबरेही आरोग्यासाठी लाभदायक ठरत असते. मात्र ओले खोबरे अधिक गुणकारी की सुके असा प्रश्नही अनेकांना पडत असतो. आता तज्ज्ञांनी याचे उत्तर दिले आहे. ओल्या नारळाचा स्वाद हलका गोड आणि मऊ टेक्स्चर असतो. सुके खोबरेही गोड असते पण ते अधिक चावावे लागते. नारळ आटून कोरडा पडला की त्याचे खोबरे करवंटीपासून वेगळे होते. असे खोबरे वाळवून ते साठवून ठेवले जात असते. हे करीत असताना त्याला बुरशी वगैरे लागू नये याची काळजी घ्यावी लागते. त्यामुळे नुकत्याच फोडलेल्या नारळातील खोबऱ्याच्या तुलनेत ते खाण्यासाठी थोडे हानीकारकही ठरू शकते. शिवाय कोरडा नारळात पाणी नसल्याने शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी त्याचा उपयोग नसतो.

नारळ सुकला की त्यामध्ये कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढते. त्यामध्ये अधिक शुगर, कॅलरी आणि फॅट असते. ओल्या नारळात अनेक जीवनसत्त्वे व खनिजे असतात. त्यामध्ये पुरेशा प्रमाणात प्रोटीनही असते. त्यामुळे असे खोबरे खाणे हे उत्कृष्ट 'प्लॅंड बेस्ड प्रोटीन डाएट ठरते. त्यामध्ये कॅलरी हेल्दी फॅट आणि ओमेगा ६ फॅटी ॲसिड असते. त्यामध्ये आढळणारे बहुतांश फॅट सॅच्युरेटेड असते. अशा ओल्या खोबऱ्यात कार्बोहायड्रेट्चे प्रमाण कमी असते. नारळाप्रमाणेच मिळणारे खोबरे एक चांगल्या इलेक्ट्रोलाईट्चेही काम करते आणि शरीराला हायड्रेट ठेवते. सुक्या खोबऱ्यात फॅट अधिक असतात तसेच ओल्या खोबऱ्याच्या तुलनेत दुप्पट कॅलरीज असतात. एकंदरीत पोषक मूल्यांचा विचार करता ओले खोबरे अधिक लाभदायक ठरते.

तव्याने चोपले चोराला!

चोरांचा अर्जेंडा एकच असतो. चोरीछुपे प्रवेश करणे, मिळेल त्यावर डल्ला मारणे आणि शक्य तितक्या लवकर तेथून मुद्देमालासह पोबारा करणे. यात काही वेळा यश येते तर काही वेळा चोरीचा पूर्ण प्रकारच अंगलट येतो. कधी दारूच्या नशेत आलेला चोरटा घरात शिरून झोपतो तर कधी चोरी केल्यानंतर चोर मालीनाम्याची चिट्ठीही ठेवून जातो. शिकागोमध्ये घरफोडी करणाऱ्या चोराबाबतही असाच काहीसा विचित्र प्रकार घडला. पण, येथे तो चोर ना झोपला, ना कोणती चिट्ठी ठेवून गेला. पण, ज्यासाठी आला होता ती चोरी राहिली बाजूला. उलट, त्यालाच घरमालकाने चक्क फ्राईंग पॅनने चोपले. त्यामुळे मार खाऊन त्याला तिथून कसेबसे निसटता आले.

ही घटना शिकागोमधील असून, त्याचे पूर्ण सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. या व्हिडीओनुसार, एक चोरटी व्यक्ती घरातून बाहेर पडताना दिसून आली. मात्र, याचवेळी घरातील एक सदस्य त्या चोरट्याभाग्ये चक्क फ्राईंग पॅन घेऊन पाठलाग करतो आणि संधी मिळताच त्याला त्या फ्राईंग पॅनने चोपून काढत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. केवळ नशिब बलवत्तर म्हणून तो सराईत चोरटा काही क्षणात तेथून पोबारा करण्यात यशस्वी ठरतो.

पोलिस घटनास्थळी येतात. मात्र, तितक्या वेळेत तेथून पोबारा करणे त्या चोरट्याला शक्य झालेले असते. जेसन विलियम्स नावाच्या व्यक्तीच्या घरी ही चोरीची घटना घडली. जेसन कामावरून घरी परतत असताना त्याला घरात बसवण्यात आलेल्या अलार्म सिस्टमवरून कोणितरी घरात घुसल्याची माहिती मिळाली. जेसन त्याच्या घरापासून थोडाच अंतरावर होता. त्यामुळे काही मिनिटांतच तो घरी पोहोचला. या दरम्यान, त्याला फ्राईंग पॅन दिसला, तो घेऊन त्याने चोरट्याचा पाठलाग सुरू केला आणि त्याला याच पॅनने चोपूनही काढले. जेसनने घरात बसवलेल्या सीसीटीव्हीवील या घटनेचा व्हिडिओ त्याच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केला. हा व्हिडीओ दीड लाखांहून अधिक लोकांनी पाहिला असून, त्यावर अनेक मलमतांतरेही व्यक्त होत आहेत.

'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा '३' सावेडी मे विराजमान है ।

''जैन'' आपण जैन धर्मात जन्म घेतला म्हणून आपण जैन आहोत का? आपण खरंच जैन सिद्धांताचे पालन करतो का? ह्याचे आज चिंतन करण्याची गरज आहे. आपण दैनंदिन कार्यात जैन धर्माचे पालन करू शकतो. जसे– एखादी गृहिणी स्वयंपाक करताना नवकार मंत्र 'ॐ' चा उच्चार केल्याने फक्त त्या गृहिणीचाच नाही, तर पूर्ण परिवाराचे कल्याण होते व सकारात्मक उर्जा मिळते.

भगवान महावीर स्वामींनी सांगितले आहे, कि जो जैन धर्माचे पालन करतो, तोच खरा जैन ''हरि केशरी मुनी'' हे राक्षस कुळात जन्म घेउन देखील जैन धर्माचे पालन केले. जैन धर्म आत्मसात केले. भगवान महावीर स्वामींनी हरि केशरी मुनीचा उल्लेख आपल्या व्याख्यानात केला आहे.

जैन धर्मात चार सिद्धांत सांगितले आहे. अहिंसा, सत्य–असत्य (ब्रह्मचरण) शुद्धता, अपरिग्रह ह्या चार सिद्धांतांचे पालन कोणीही केले, तरी त्यांना मुक्ति मिळते व मोक्ष मार्गाचा रस्ता मोकळा होतो.

जन्ममरण्याचा फेऱ्यात मनुष्याच्या दृष्टीने धर्म एक 'द्विप' आहे, गति आहे आणि उत्तम शरण आहे. जैन धर्माची शक्ति जीवनाची सर्वात मोठी शक्ति होय. धर्मामुळे सर्वांचे जीवन सुखी होते. हे धर्म चार प्रकारे केले जाते. दान, शील, तप आणि साधना ह्याप्रकारे आराधना केली जाते. आपण चार तत्त्वाला ग्रहण करू शकतो नाही, तरी किमान एक तत्त्व अंगीकार करून आत्मकल्याण करू शकतो.

– सौ. सविता चोरडिया

मागील दहा वर्षात शहराची रया गेली, रस्त्यांची अवस्था दयनीय; परिवर्तन होणार, नगर भयमुक्त करण्याची जबाबदारी आपल्यावर

आमदार बाळासाहेब थोरात

नगर – शहरात काँग्रेसच्या कार्यक्रमाला माणसे उपस्थित राहणे अवघड असते. दहशत, दादागिरी, भीतीचे वातावरण असते. अशा स्थितीत आजच्या मेळाव्याला आलेले शूरवीर आहेत, नगर भयमुक्त करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. मागील दहा वर्षात शहराची रया गेली आहे. रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. तिकडे रोज एमआयडीसीच्या घोषणा होतात, पण नगरच्या एमआयडीसीकडे दुर्लक्ष होत आहे. किरण काळे यांनी सुंदर व विकसित शहराची संकल्पना मांडली आहे. तिला ताकद द्यायची आहे. त्यामुळे परिवर्तन होणार व नगर बदलणार असा विश्वास आ. बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला.

नगर शहरातील माऊली सभागृहात लक्ष्य विधानसभेचे – महासंकल्प मेळावा शहर जिल्हा व ग्रामीण जिल्हा काँग्रेसच्या वतीने आयोजित केला होता. यावेळी खासदार निलेश लंके, आ. लहू कानडे, जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे, मनोज गुंदेचा, संजय झिंजे, अनिस चुडीवाला, विलास उबाळे दशरथ शिंदे, सुनील क्षेत्रे, अभिनय गायकवाड, इंजि. सुजित क्षेत्रे, स्वप्निल पाठक, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, उषा भगत, आशा लांडे, मिनाज सय्यद, हेमंत ओगले, कैलास शेवाळे, करण ससाणे,

आ. बाळासाहेब थोरात व खा. निलेश लंके यांचा किरण काळे व जयंत वाघ यांनी सत्कार केला.

किरण पाटील आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी गुंदेचा, झिंजे, उबाळे, क्षेत्रे, निजाम जहागीरदार यांनी मनोगत व्यक्त करताना नगर शहराची जागा कोणत्याही परिस्थितीत काँग्रेसकडे घ्यावी आणि किरण काळे यांना उमेदवारी द्यावी. शहरातील कार्यकर्ते त्यांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करतील. जिल्ह्यात दोन्ही खासदार महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी शरद पवार पक्ष व शिवसेना उबाठा गटाचे केले. काँग्रेसचा एकही खासदार झाला नाही. आता नगर शहरातून काँग्रेसचा आमदार करा. ज्याप्रमाणे सर्वसामान्य कुटुंबातील निलेश लंके यांनी विजय खेचून आणला त्याच पद्धतीने काळे यांचा देखील विजय नगरकर करतील यासाठी शहरातील पदाधिकाऱ्यांनी थोरात यांना साकडे घातले. यावेळी मेळाव्याच्या ठिकाणी आणि परिसरात थोरात यांचे भावी मुख्यमंत्री आणि काळे यांचे भावी आमदार असे फलक कार्यकर्त्यांनी झळकवले.

थोरात म्हणाले, जिल्ह्यातून सक्षम लोकप्रतिनिधी पाठवायचे निवडणूक काळात काँग्रेसच्या एकाही पदाधिकाऱ्यानी मला त्रास दिला नाही. उलट पदर पैसे घालून माझे काम केले.

यावेळी बोलताना किरण काळे यांनी नगर शहर विकासाचे व्हीजन मांडले. शहरात मेडिकल टुरिझम वाढवण्याचा माझा प्रयत्न असून येथे एअर ॲम्बुलन्स व एअरपोर्ट गरजेचे आहे. महापालिकेचा कारभार भ्रष्टाचार मुक्त करायचा आहे. नगर शहरातील तरुणांच्या हाताला रोजगार देण्यासाठी आयटी पार्क करिता स्पेशल इकॉनोमिक झोनला मान्यता राज्य सरकारने द्यावी म्हणून मी विधानसभा मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली. मात्र त्यांचे साथे उत्तर देखील आले नाही. काही काळ थांबा. लवकरच विधानसभा होतील राज्यात महाविकास आघाडीचे सरकार पुन्हा येईल. त्यात थोरात हे मुख्यमंत्री होतील. आपण त्यांच्याकडूनच नगर शहराच्या या प्रकल्पासाठी मंजुरी आणू, मला एक संधी मिळाली तर मी शहर भयमुक्त करून विकासाच्या वाटेवर घेऊन जाईल, असे काळे म्हणाले.

धार्मिक कार्याने जीवनात सुख-शांती-समाधान लाभते : पुजारी संगमनाथ महाराज

सावेडी शिंदे मळा येथील श्री संत नामदेव मंदिरात संत नामदेव महाराज मुर्ती प्रतिष्ठापणा सोहळा व कलाशारोहण

नगर – साधू–संताच्या आशिर्वादाने समाजात प्रेम, बुद्धी, सहिष्णुता, सात्विकता वृद्धींगत होण्यासाठी संतांनी आपले आयुष्य सत्कार्णी लावले. समाजाला सर्वांपूर्ण, संस्कारक्षम व बलशाली होण्यासाठी नामयज्ञाचे महत्व आहे. आज संत नामदेव महाराजांची मुर्ती प्रतिष्ठापना व कलाशारोहण सोहळ्याने परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे. मंदिर समितीने मंदिर कार्यात दिलेले योगदान हे महत्वपूर्ण असेच आहे. या सोहळ्याने सर्वांच्या जीवनात सुख–शांती–समाधान लाभणार आहे. तसेच संत नामदेवांचे कार्य अधिक व्यापक होईल, असे प्रतिपादन श्री विशाल गणेश मंदिरचे पुजारी संगमनाथ महाराज यांनी केले.

श्री संत नामदेव मंदिर येथे संत नामदेव महाराज मुर्ती प्रतिष्ठान सोहळा व कलशारोहण समारोह श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.

सावेडी शिंदे मळा येथील श्री संत नामदेव मंदिर येथे संत नामदेव महाराज मुर्ती प्रतिष्ठान सोहळा व कलाशा रोहण समारोह श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ट्रस्टच्या अध्यक्षा प्रमिला दुमाटे, उपाध्यक्ष दिलीप काकडे, सचिव राजू बगाडे, विश्वस्त विजय काकडे, सुरेश लोळगे, श्रीकांत बुलबुले, सुधीर नेवासकर, राजू पाटठुकले, अनिल वाव्हळ, कौशल चुंबळकर, अनिता वाघवणे, महेश चौकटे, अशोक होमकर, पुजारी नरेंद्र पैठणकर आदि उपस्थित होते.

सौ.प्रमिला दुमाटे यांनी सांगितले की, संत नामदेव महाराज मुर्ती प्रतिष्ठान सोहळ्यानिमित्त तीन दिवसीय धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शोभायात्रा, गणेश पुजन, होम–हवन, कलाशारोहण, संत नामदेव, श्री विठ्ठल–रुख्मिणी मुर्तीची प्राणप्रतिष्ठा, आरती होऊन महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला असल्याचे सांगितले.

धार्मिक कार्यासाठी श्री.निलेश व सौ.शितल चौकटे, श्री.सचिन व सौ.वंदना काकडे, श्री.राजेंद्र व सौ.लक्ष्मी पाटठुकले, श्री.विजय व सौ.प्रफुल्लता काकडे, श्री.दिलीप व सौ.क्रांती काकडे, श्री.कौशल व सौ.अनिता चुंबाळकर, श्री. संतोष व सौ.जयश्री सातपुते, श्री.राहुल व सौ.स्वाती कोळेकर, श्री.अशोक व सौ.मंगल होमकर आदि सहभागी झाले होते. यानिमित्त सायं. ६ ते ७ महाप्रसाद, व रात्री ८ वा. हरिकिर्तन होणार आहे.

याप्रसंगी निर्मला लोळगे, हेमा वडे, श्री व सौ.बारटक्के, अशोक वडे, सौ.बोंडगे, श्री व सौ.लिमकर, कमल बोंडगे, अरुण मुळे, विष्णूपंत वनारसे, उषा वडे, मनिषा वाघवणे, भागवत लोळगे, विठ्ठल वनरसे, कान्हा पाटठुकले, संतोष आंबेकर, रोहिदास वडे, संगीता गणबोटे, कोमल महेश चौकटे आदिंसह समस्त नामदेव शिंपी समाजा ट्रस्टचे सर्व विश्वस्त पदाधिकारी, युवक मंडळ, महिला मंडळ, समाज बंधू–भगिनी व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू बगाडे यांनी केले तर आभार सुधीर नेवाकर यांनी मानले.

नगर क्लब येथे ब्रिटिश कालीन वृक्ष पाऊस व वादळाने गाडीवर आदळल्यामुळे गाडीचे नुकसान झाले आहे. (छाया – बबलू शेख)

दरेवाडी येथे ओंकार संगीत निकेतनची २८ जुलै रोजी 'भक्तीरंग' मैफल

नगर – दरेवाडी येथे पावन हनुमान मंदिर, आयोजित भक्तिरंग ही ओंकार संगीत निकेतनच्या विद्यार्थ्यांची अभंगवाणी आणि भक्तीगीतांची मैफल २८ जुलै रोजी वाकोडी फाटा, सोलापूर रोड येथील पावन हनुमान मंदिरात सायं. ५ वाजता होणार आहे.

या कार्यक्रमात श्रेया पंडित, तन्वी ढोरे, श्रीराम खांदवे, प्रबुद्ध किंदे, वैभवी चव्हाण, वैष्णवी चव्हाण, सानवी मुरुमकर, श्रद्धा गौड, पायल राजत, संस्कृती कोठुळे, श्रद्धा किंदे, ईश्वरी ननवरे, अक्षरा घुटे, सानिका ओटे, देविदास सोनसळे, अंकित पवार, गायत्री धनलगडे या विद्यार्थ्यांचे गायन सादर होणार असून त्यांना मार्गदर्शन आणि संवादिनीची साथ संचालक ओंकार देऊळगांवकर आणि तबल्याची साथ प्रसाद सुवर्णपाठकी करणार आहेत. तर तालवाद्यांची साथ वैष्णवी, राधिका आणि गोपाळ कोल्हे करणार असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी देऊळगांवकर करणार आहेत.

ओंकार संगीत निकेतनच्या दरेवाडी शाखेतील विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचा हा प्रथमच कार्यक्रम असून या कार्यक्रमाला सर्व ग्रामस्थांनी व रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या गायनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन विद्यालयाचे संचालक ओंकार देऊळगांवकर आणि पावन हनुमान मंदिराचे जालिंदर भोगाडे यांनी केले आहे.

विशाळगडाजवळील गजापूर हिंसाचारप्रकरणी दोषींवर कारवाई करा, नुकसान भरपाई द्यावी

घटनेची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी; जिल्हाधिकारी यांना निवेदन

नगर – विशाळगडच्या पायथ्याशी असलेल्या गजापूर येथील हिंसाचार प्रकरणी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांची भेट घेऊन सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई व्हावी, हिंसाचाराशील कुटुंबीयांना नुकसान भरपाई मिळावी व या प्रकरणाची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्याच्या मागणीसाठी निवेदन देण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक समवेत हाजी एजाज अहमद, अब्रू शेख, अल्ताफ सर्जेपुरेवाले, आतूब शेख, परवेज पटेल, वाहिद शेख, आयाज बागवान, रौफ लाला पेंटर उपस्थित होते.

विशाळगडाजवळील गजापूर हिंसाचारप्रकरणी दोषींवर कारवाई करा, नुकसान भरपाई द्यावी, या मागणीचे निवेदन उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना देण्यात आले.

विशाळगड (जि. कोल्हापूर) अतिक्रमणमुक्त करण्याच्या नावाखाली गडापासून ३ कि.मी. अंतरावर पायथ्याशी असलेल्या गजापूर गावातील मुस्लिम समाजातील घरांवर नियोजित पध्दतीने समाजकंटकांनी हल्ले केले. घरात बसलेल्या महिला व ज्येष्ठांना मारहाण करण्यात आली. मोठ्या प्रमाणावर घरांचे नुकसान करून वाहनांची जाळपोळ करण्यात आली. यामध्ये कोट्यावधीचे नुकसान झाले आहे.

मुस्लिम समाजातील काही व्यक्तींचे विशाळमडावर हॉटेल आहे. मात्र ते देखील उदरनिर्वाहासाठी तेथील माजी सरपंचांनी भाडे करारावर दिल्याचे समोर आले आहे. विशाळगडावरील अतिक्रमणाचा प्रश्न सामोपचाराने सुटण्याआधीच षडयंत्रपूर्वक मुस्लिम वस्तीला टार्गेट करुन हिंसाचार घडविण्यात आला. अतिक्रमणमुक्तीसाठी काढण्यात आलेल्या मोर्चाची गरज होती का? हे देखील तपासण्याची गरज आहे. विशाळगड अतिक्रमण मुक्त करण्याची दिलेली हाक, फक्त एकाच गडासाठी कशाला मर्यादीत असावी.

ज्यांनी हे कृत्य केले ते छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे असू शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज असते, तर त्यांनी निरापराध लोकांच्या घरावर हल्ले करणाऱ्यांना कठोर शिक्षा केली असती.

अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली जमावाने मुस्लिम समाजाला टार्गेट केले. तलवारी, काठ्या, कोयते अशी घातक शस्त्र घेऊन घरांची मोडतोड करुन वाहनांची जोडपोळ केली. धार्मिक स्थळाची विटंबना केली. पुरोगामी महाराष्ट्राला ही घटना अशोभनीय आहे.

या घटनेमुळे राज्यातील मुस्लिम समाज दहशतीच्या सावटाखाली वावरत आहे. अशा घटनातून त्यांच्यावर दहशत निर्माण करण्याचे काम केले जात आहे.

विशाळगड येथील गजापूर हिंसाचार प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई व्हावी, हिंसाचाराशील कुटुंबींयांना नुकसान भरपाई मिळावी व अशा घटनांची पुनरावृती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे निवेदनात म्हंटले आहे.

टेलरच्या दुकानातून चोरी; गुन्हा दाखल

नगर – कपड्यांचे शिवणकाम करणाऱ्या टेलर व्यावसायिकाचे दुकान रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्यांनी फोडून चोरी केल्याची घटना नगर तालुक्यातील शिंगवे नाईक या गावात दि.२१ जुलै रोजी सायंकाळी ७ ते २२ जुलै रोजी सकाळी ७.३० या कालावधीत घडली आहे.

याबाबत खंडू कारभारी जाधव (रा. शिंगवे नाईक, ता.नगर) यांनी गुरुवारी (दि.२५) दुपारी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे गावात गणपती चौकात असलेले के. कुमारी हे टेलरिंग चे दुकान अज्ञात चोरट्यांनी फोडून दुकानातील १ शिलाई मशीन तसेच नवीन शिवलेले कपडे चोरून नेले असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३३१ (४), ३०५ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

तोफखाना येथे बागुलु पंडुगा सणानिमित्त आ. संग्राम जगताप यांनी श्री शितळा देवीचे दर्शन घेतले. (छाया – लहू दळवी)

धार्मिक परंपरा जोपासण्याचे काम आपण सर्वांनी करावे

आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; बागुलु पंडुगानिमित्त श्री शितळा देवीचे घेतले दर्शन

नगर – आपल्याला मोठी धार्मिक परंपरा लाभली असून तिचे जतन करण्याचे काम सर्वांनी करावे, पद्मशाली समाजाच्या या सणानिमित्त पोघम्मा व लचयम्मा या दोन देवतांना प्रेमपूर्वक नैवेद्य प्रदान करण्यासह निसर्गाच्या सानिध्यात वनभोजनाचा आस्वाद घेण्याचा हा आनंददायी दिवस असतो, पावसाळयात होणाऱ्या संसर्गजन्य रोगांपासून आपल्या परिवारासह सर्वांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी देवतांना साकडे घालण्याची ही शेकडो वर्षांची परंपरा आहे. त्यानुसार मी सर्वांचे आरोग्य निरोगी राहावे यासाठी श्री शितळा देवीला प्रार्थना करतो, तसेच आजच्या युवा पिढीला धार्मिकतेचे महत्व पटावे यासाठी उत्साहात आपले सण साजरे करावे, असे आवाहन करत आ. संग्राम जगताप यांनी पद्मशाली समाज बांधवांना बागुलु पंडुगा सणाच्या शुभेच्छा दिल्या.

तोफखाना येथे बागुलु पंडुगा सणानिमित्त आ. संग्राम जगताप यांनी श्री शितळा देवीचे दर्शन घेतले. यावेळी दीपक सूळ, रवी दंडी, चेतन अरकल, अभिजित अरकल, हरिभाऊ एलदंडी, राकेश गवते, राहुल जव्हेरी, किरण भंडारे यांच्यासह पद्मशाली समाज बांधव उपस्थित होते.

मंडप व्यावसायिकाच्या ऑफिसमध्ये चोरी

नगर – नगर शहरातील मंडप व्यावसायिकाच्या माळीवाडा येथे असलेल्या ऑफिस मध्ये चोरी झाली अज्ञात इसमाने ऑफिस मधून रोख रक्कम, मालमत्तांची खरेदीखते, सट्टा केलेले चेक असा ऐवज चोरून नेल्याची घटना बुधवारी (दि.२४) सकाळी १०.३० ते ११.१० वाजण्याच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत पंडित नारायण खरपुडे (वय ७०, रा. विशाल गणपती मंदिरासमोर, माळीवाडा) यांनी गुरुवारी (दि.२५) रात्री उशिरा कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा मंडप व डेकोरेशनचा व्यवसाय असून त्यांचे माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिरासमोर कैलास मंडप डेकोरेशन या नावाने ऑफिस आहे. या ऑफिस मधून कोणीतरी अज्ञात इसमाने बुधवारी (दि.२४) सकाळी १०.३० ते ११.१० वाजण्याच्या दरम्यान रोख रक्कम, मालमत्तांची खरेदीखते, सट्टा केलेले चेक असा ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. तसेच या चोरीबाबत त्यांनी त्यांच्या मुलावर संशय व्यक्त केला आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी बी.एन.एस.२०२३ चे कलम ३०५ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

पदमशाली समाजाच्या बागुलु पंडुगू सणानिमित्त शीतळा देवी मंदिर येथे दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंद्रनमल मुंदेच्या यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य मुंदेच्या चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून वेबेच प्रसिद्ध केले.

कल्याणी लेडीज होस्टेल,
सबजेलरोड, अ.नगर

माऊली जेन्टस होस्टेल,
गुजरगल्ली, अ.नगर
९८२२०३६६३०

मोठे १ रुम किचन फ्लॅट भाड्याने देणे
भवानीनगर इंद्रप्रस्थ मंगल कार्यालयाशेजारी आनंदधाम शेजारी ऑफिसकरिता किंवा राहण्यासाठी १ रुम किचन भाड्याने देणे.
8379036036
9011117775

भाडेतत्वावर देणे
माणिकनगर आनंदऋषी हॉस्पिटलमागे बंगल्याचा प्रशस्त 2.5 BHK चा पहिला मजला भाडेतत्वावर देणे.
(फक्त फॅमिलीसाठी)
9271911889

गाळे,ऑफिस भाड्याने देणे
मार्केटयार्ड,अहमदनगर येथे शिवाजी महाराज पुतळ्याजवळ
9422220438

जागा भाड्याने देणे
शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सविताबाई फिरोदिया शाळेजवळ १३०० स्क्वे.फूट जागा, क्लासेस, ऑफिससाठी उपयुक्त.
8788018576

बेसमेंट दुकान विकणे आहे
भिडे हॉस्पिटलसमोर, सावेडी नाका,अ.नगर
9209279202

सरकारमान्य संस्था घरबसल्या रोज ५०० ते १००० रु. कमवा
बाराही महीने विविध पॅकिंगचे व्यवसाय करा.. माल फ्री घरपोहोच
धनश्री उद्योग
अंबर प्लाझा बेसमेंट, नगी मेडिकलच्या खाली, माळीवाडा एस.टी. स्टॅण्ड समोर, अ.नगर.
7066575497

कामगार पाहिजे
मार्केटयार्ड परिसरात बंगल्यावर कामासाठी **स्त्री/पुरुष कामगार पाहिजे.**
: संपर्क :
फक्त शनिवारी सकाळी ११ ते ५
8847756444
(इतर वेळी फोन करू नये)

मुले पाहिजेत
कॉफी शॉपवर कामासाठी मुले पाहिजेत २
इच्छुकांनी प्रत्यक्ष येऊन भेटावे
कपिश कॅट कॉफी
प्रोफेसर कॉलनी चौक, सावेडी अ.नगर
मो.-8805309777, 7020553064

अकौंटंट/ड्रायव्हर पाहिजेत
बांधकाम व्यवसायातील कामाचा अनुभव असलेला
9273885885

पाहिजेत
अहमदनगरमधील एका नामांकित बांधकाम कंपनीस साईट सुपरवायझर पाहिजे.
पात्रता : बांधकाम क्षेत्रात साईट सुपरवायझर म्हणून १० ते १२ वर्षाचा अनुभव (आयटीआय असेल तर प्राधान्य)
संपर्क : 9850894148/9922965621

कमर्शिअल कम रेसिडेंशिअल प्रोजेक्ट जॉईंट व्हेंचरमध्ये डेव्हलप करण्यास देणे आहे
अहमदनगर शहराच्या प्राईम एरियामध्ये ९२ मीटर व २४ मीटर रोड लगत ७५०० स्क्वे.फुट प्लॉटवर अंदाजे ३०००० स्क्वे.फुट बांधकामाचे कमर्शिअल कम रेसिडेंशिअल प्रोजेक्ट जॉईंट व्हेंचरमध्ये डेव्हलप करण्यास देणे आहे.
– संपर्क –
9890098501, 9167795192

बजाज वॉटरप्रुफिंग कं.
जर्मन टेक्नॉलॉजी
तोडफोड न करता ५ वर्षांच्या लेखी गॅरंटीसह केमिकल वॉटरप्रुफिंग स्लॅब, बाल्कनी, वाशरूम, पाण्याची टाकी ई.
9096291653

Bhairavnath Education Society's School
(CBSE affiliated school)
APPOINTMENT (REQUIRED)

Sr. No.	Name of Post	No. Of Post	Qualification	Subject
1	Principle	1	M.A./M.Sc., B.Ed.	Maths/Science/ English
2	Asst. Teacher	1	B.Sc., B.Ed.	Maths
3	Asst. Teacher	1	B.Sc., B.Ed.	Science
4	Asst. Teacher	1	B.A., B.Ed.	English
5	Asst. Teacher	1	B.A., B.Ed.	Social Science
6	Asst. Teacher	1	B.A., B.Ed.	Hindi

Interested candidates should attend interview with resume and handwritten application on below mentioned address.
■ Day : Monday ■ Date : 29/07/2024 ■ Time : 10.00am
Venue : Jagdamba Secondary School
Udayanraje Nagar, Near Bhagyodaya Mangal Karyalay, Near Water Tank, Kedgaon, Ahmednagar- 414005. **Mobile 8788841485 / 8830304141 / 9922663839**
Note : For all the mentioned posts English fluency is must.
Secretary / President

फक्त 15 मिनिटात सोने तारण कर्ज
9% व्याजदर
लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या.
कर्ज मंजूरीसाठी संपर्क :
7888219471, 9423167850
वाशमपट्टी, अहमदनगर
बुल्ल टक्के प्रोसेसिंग फी
प्रति तोळा ₹ 54000

अ.नगर काफड बाजार येथे
शॉप्स उपलब्ध
ऑफर मर्यादित कालावधीसाठी, सर्व सुविधांयुक्त, सी.सी. टिव्ही. कॅमेरे, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच वांशरूमची सुविधा
अभी नही तो.. कभी नही..
– संपर्क –
9270570699

अ.नगर मधील नामांकित कंपनी वास्तूपुज्य रिअॅलिटीमध्ये ऑफिस कामाकरिता मुले पाहिजेत.
(ड्रॉफ्टमन : ऑटोकॅड अॅण्ड एम.एस.ऑफिस)
9579990332

चाहिए
सेफ सिक्योरिटी अॅण्ड अलाइड सर्व्हिस को भारी मात्रा में सिक्योरिटी गार्ड और हेल्पर, वेल्डर और हाऊसकिपिंग की आवश्यकता है।
7020839133
8081919753

जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह, अहमदनगर
सोनोग्राफी ₹500/- | सुपरिन्टेन्डेन्ट हॉस्पिटल ₹9000/- | सुसज्ज हॉस्पिटल ₹19000/-
प्रसुतीगृह । स्त्री रोग । वंध्यत्व निवारण । लॅप्रोस्कोपी । शासनमान्य गर्भपात केंद्र
जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह
पुणे बसस्टॅण्डजवळ, स्वस्तिक चौक, हॉटेल रॅडिसनच्या पाठीमागे, अहमदनगर. मो. 74105 94116, फोन (0241) 7961062.

भावपूर्ण श्रद्धांजली
कै.दशरथ शंकर बिडकर
(पोलिस दल विशेष शाखा)
स्व.दि.२५ जुलै २०२४
तुमचे असणे आमच्यासाठी सर्व काही होते, ते आमच्या आयुष्यातील सुंदर पर्व होते.. आज सर्व काही असल्याची जाणीव आहे, पण तुमचं नसणं ही मोठी उणीव आहे..
आपल्या पावन स्मरणीय भावपूर्ण श्रद्धांजली!
समस्त बिडकर परिवार

कुठे असा PROPERTY वर नजर ठेवा
Water Proof Camera
360 Degree View
Easy Mobile Access
ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
98222 94622
94220 87757

॥ श्री कुलस्वामीनी प्रसन्न ॥
गोविंदा ! गोविंदा !! गोविंदा !!!
श्री तिरुपती बालाजी
दर्शनस्थ श्री पद्मावती, गोविंदराज दर्शनस्थ कोल्हापुर महालक्ष्मी
सहल दि. ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० ऑक्टोबर २०२४ बुधवार दि. १५ सुटी वगळून सुरू (व्यवस्थित सिटवा)
☆ दर्शनीय स्थळे ☆
श्री वेंकटाची वास्तव्य व वास्तवाचा ☆ अलवाचार्य
☆ बसणी पद्मावती दर्शनाचा ☆ दिव्य लोकाचा
☆ गोविंदराज मंदारी दिव्यात ☆ मुक्तामणी आत्मा दिव्यात
☆ श्री अनिरुध्दाचा मंदारी दिव्यात ☆ कोल्हापुरा महालक्ष्मी
☆ प्रतिव्यक्ती ☆
₹ 6501/-
☆ उपस्थित गोष्टी ☆
प्रतिव्यक्ती (३, ३, ४ शयनीय) बस, नाश्ता, जेवण सकाळी बीसह ३ (५०० किमी) सुटसह सामाजीची जेवण सुटसाठी व मंदीरे प्रवेश, विमान भाडाचे वेगळे प्रतिव्यक्ती, प्रवास वाढ
☆ ऑफिस ☆
फोन : मो. 8226399555 / 9637746555
पुणे : मो. 9168005150 / 9819827917
नाशिक : मो. 9922201125 / 8149324403
जालना : मो. 9595150999
कडा : मो. 7030034041 / 9423471413
Holidays & Multiple services

REVOLUTION in animation world
COURSE HIGHLIGHTS
Complete 3D Animation career program
Industry visits & workshops
Making a portfolio after every Module
E-Projects
graphic designing
web designing
2d & 3d animation
18 MONTH PROGRAM
CERTIFICATE COURSE IN SOFTWARE PROGRAMMING
C Programming
C++ Programming
Data Structure, PHP
Python, Java
.Net
Duration : 6 Months
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Superkar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 — 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lohmandhan Office, Near Mahavada Stand, Station Road, A.nagar — 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Shivaliaq Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 — 7447761769
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE

बागुल पंडुगु
सणानिमित्त
सर्व पद्मशाली समाज बांधवांना **मंगलमय शुभेच्छा..**
✻ शुभेच्छुक ✻
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, सर्व पदाधिकारी, सभासद व कार्यकर्ते
मा. महापौर अभिषेक कळमकर मित्र परिवार
श्रीयोग प्रतिष्ठान
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

रिप : सुट्टी-शो घ्या वेळा बदलू शकतात
दिनांक : 26 जुलै ते 2 ऑगस्ट 2024

डेडपुल अॅण्ड वूलवरीन (3D)		7.30 AM, 10.00 AM, 12.40 PM, 3.15 PM 5.50 PM, 8.25 PM, 11.00 PM
रामायण		9.30 AM, 10.00 PM
कल्की		12.30 PM, 6.30 PM
बॅड न्युज		9.00 AM, 2.15 PM 7.45 PM, 10.45 PM
गूगल आई	(मराठी)	11.45 AM
घरात गणपती	(मराठी)	5.00 PM
द अप फाईल्स्	(मराठी)	4.00 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX 3rd RT THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
✻ चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
✻ पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
✻ डोळ्याच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यूरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निझेन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
✻ सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
✻ सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिवीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

GET NEW / RENEW PASSPORT
*With 100 % Cashback
भारत गणराज्य REPUBLIC OF INDIA पासपोर्ट PASSPORT
For Child — Rs. 1350/- — With 5 Yrs Validity
For Adult — Rs. 1850/- — With 10 Yrs Validity
*Terms & Conditions Apply
For More Details Call 73505 40009 / 73505 50009
Namoh Since 1984 Limited Seats Offer
All Domestic & International Packages available